गुरुवार, 7 जुलै 2022
⊙ किमत 5 रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - 01 ⊙ अंक - 302
Title Code : MAHMAR51117

# आधुनिक केसरी

● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● THURSDAY 7 JULY 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-01 ● ISSUE-302 ● TITLE CODE : MAHMAR51117 ● PAGE-10 ● PRICE-5

# वारकऱ्यांना टोल माफ

## आमच्यापेक्षा वारकऱ्यांच्या सुरक्षितेकडे लक्ष द्या : एकनाथ शिंदे

आधुनिक केसरी न्यूज

**ठाणे : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज आषाढी एकादशीच्या अनुषंगाने पंढरपूर येथील वारकऱ्यांच्या सोयीसुविधांबाबत आढावा बैठक घेतली. खड्डे लक्षपूर्वक भरा, खड्ड्यांमुळे अपघात होऊन कुणी जखमी होऊ नये, याची प्रामुख्याने दक्षता घ्या, अशी सूचना एकनाथ शिंदे यांनी अधिकाऱ्यांना दिल्या. वारकऱ्यांच्या सोयीसुविधांबाबत बैठक झाल्यानंतर एकनाथ शिंदे यांनी माध्यमांशी संवाद साधला.**

कोकणातील गणेशोत्सवाप्रमाणे पंढरपूर येथे आषाढीच्या वारीसाठी जाणाऱ्या वारकऱ्यांच्या वाहनांना टोल माफ करण्याचे निर्देश दिले. तसेच अतिरिक्त मुख्य सचिव दर्जाच्या अधिकाऱ्याची पंढरपूर वारी यात्रेसाठी समन्वयक म्हणून नियुक्ती करा, असे निर्देश एकनाथ शिंदे यांनी यावेळी दिले.

वारीच्या पार्श्वभूमीवर सर्व नियोजन झाले आहे. पंढरपूर वारकरी समितीकडून वारकऱ्यांसाठी उत्तर सोय करण्याच्या सूचना एकनाथ शिंदे यांनी दिल्या आहेत. त्याचप्रमाणे आमच्यापेक्षा वारकऱ्यांच्या सुरक्षितेकडे जास्त लक्ष द्या, असे एकनाथ शिंदे अधिकाऱ्यांना आणि पोलिसांना म्हणाले. मोठा पाऊस झाला तर पाणी साचू नये यासाठी व्यवस्था करा, त्यासाठी पंपाचा वापर



करा. आरोग्य सुविधा औषधे, फवारणी तसेच तापाची, साथीच्या आजारांवरील औषधांचा पुरेसा साठा यांची आतापासूनच व्यवस्था करा, अशा सूचना एकनाथ शिंदे यांनी दिल्या.

**राज्यस्तरीय कोविड टास्क फोर्सचे काम नेहमीप्रमाणे सुरू राहावे : मुख्यमंत्री**

कोविड काळात स्थापन करण्यात आलेल्या राज्यस्तरीय टास्क फोर्सचे कामकाज नेहमीप्रमाणे सुरू ठेवावे आणि कोविड परिस्थितीत शासनाला योग्य त्या सूचना देण्यात खंड पडू देऊ नये, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले आहेत. आज सकाळी मुख्यमंत्र्यांनी मुख्य टास्क फोर्सचे अध्यक्ष डॉ. संजय ओक यांच्याशी चर्चा करून त्यांना यासंदर्भात सूचना दिल्या आहेत.

### शिंदे यांना आषाढीच्या महापूजेचे निमंत्रण

पंढरपूरच्या श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीच्या वतीने मंगळवारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना आषाढी एकादशीच्या श्री विठ्ठलाच्या महापूजेचे निमंत्रण देण्यात आले. मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर व समितीचे इतर पदाधिकारी यांनी शिंदे यांच्या ठाण्यातील निवासस्थानी जाऊन परंपरेप्रमाणे हे आमंत्रण दिले. गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी निमंत्रण देतानाच मुख्यमंत्री शिंदे यांचा वारकरी फेटा, उपरणे, वीणा आणि पांडुरंगाची प्रतिमा देऊन सत्कार केला. पंढरपूर प्रांताधिकारी आणि मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी गजानन गुरव यावेळी उपस्थित होते.

## महत्त्वाची बातमी

### भावना गवळींची लोकसभा प्रतोदपदावरून उचलबांगडी



आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना आमदारांचा मोठा गट पक्षातून फुटून निघाल्यानंतर शिंदेंनी भरत गोगावले यांची पक्षाच्या प्रतोदपदी नियुक्ती केली. यामुळे शिवसेनेला विधानसभेत बहुमत चाचणीवेळी आणि अध्यक्ष निवडणुकीवेळी मोठ्या पेचप्रसंगाचा सामना करावा लागला. या पार्श्वभूमीवर आगामी राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीआधी शिवसेनेनं मोठा निर्णय घेतला आहे. शिवसेनेच्या लोकसभेतील प्रतोद भावना गवळी यांची उचलबांगडी करत खासदार राजन विचारे यांची पक्षाच्या लोकसभा प्रतोदपदी नियुक्ती करण्यात आली आहे. यासंदर्भात शिवसेना खासदार संजय राऊत यांनी संसदीय कामकाज मंत्री प्रल्हाद जोशी यांना पाठवलेले पत्र सध्या व्हायरल होत आहे. महाराष्ट्रात राजकीय घडामोडी सुरू होण्याच्याही आधी भावना गवळी ईडीच्या रडारवर होत्या. त्यांना ईडीकडून नोटीस देखील बजावण्यात आली होती. सध्या एकनाथ शिंदेंसोबत गेलेल्या आमदारांना ईडीची भिती दाखवून तिकडे वळवण्यात आल्याचा दावा शिवसेनेकडून करण्यात येत आहे.



### सगुण निर्गुण

सगुण निर्गुण | विठूचा महिमा ||
नसे अंत सीमा | पांडुरंगा ||१||

तूच पंच प्राण | माझिया जीवाचा ||
काया मने वाचा | सांभाळीतो ||२||

भेटतो राऊळी | सावळा श्रीहरी ||
दुःख माझे हारी | तुची देवा ||३||

नामाचा गजर | करू रात्रंदिस ||
जीव कासावीस | संसारात ||४||

नको धनधान्य | सुग्रास भोजन ||
सेवा ही महान | घडो तुझी ||५||

मागणे हे एक | देई दान देवा ||
विसर न व्हावा | तुझा कधी ||६||

अभंग विठुचा | नित्य पडो कानी ||
अमृताची वाणी | निरंतर ||७||

विटेवरी उभा | कैवारी दिनांचा ||
बाप लेकरांचा | मार्ग दावी ||८||

दिपा म्हणे आता | सापडले धाम ||
मुखी हरिनाम | विठ्ठलाचे ||९||

सौ. दिपाली मंगेश निनावे
औरंगाबाद



# देवेंद्र फडणवीसांचा गडकरींना अगदी वाकून नमस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** भारतीय जनता पार्टीत आपल्या कर्तृत्त्वाने देशपातळीवर स्वतःचे वेगळे असे स्थान निर्माण करणारे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची बुधवारी नागपूरमध्ये भेट झाली. महाराष्ट्रात नुकतेच भाजपने एकनाथ शिंदे यांच्या साथीने सरकार स्थापन केले होते. या सगळ्या रंगतदार राजकीय घडामोडींनंतर दिल्लीत असणारे नितीन गडकरी हे बुधवारी नागपूरमध्ये दाखल झाले. यावेळी नागपूरमध्ये असलेले नवनिर्वाचित उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नितीन गडकरी यांची नागपूर विमानतळावर भेट घेतली.

यावेळी देवेंद्र फडणवीस यांनी अगदी वाकून नितीन गडकरी यांना नमस्कार केला. गेल्या काही वर्षांमध्ये महाराष्ट्राच्या राजकारणात फडणवीस आणि गडकरी यांच्या गटातील सुप्त स्पर्धा अनेकदा चर्चेचा विषय ठरली आहे. या पार्श्वभूमीवर देवेंद्र फडणवीस यांनी नितीन गडकरी यांना अगदी कमरेत लवून नमस्कार केल्याने राजकीय वर्तुळात नवी चर्चा सुरु झाली आहे. देवेंद्र फडणवीस आणि नितीन गडकरी यांचा हा फोटो सध्या सोशल मीडियावर चर्चेचा विषय ठरत आहे.

नागपूर विमानतळावर भेट झाल्यानंतर नितीन गडकरी आणि देवेंद्र फडणवीस हे हसतमुखाने प्रसारमाध्यमांना सामोरे गेले. आता नागपूरमध्ये फडणवीस आणि गडकरींमध्ये काही चर्चा होते का, हे पाहावे लागेल. देवेंद्र फडणवीस यांनी गेल्या काही वर्षांमध्ये महाराष्ट्रात आपले कर्तृत्त्व पुरेपूर सिद्ध केले आहे. आजघडीला महाराष्ट्रात देवेंद्र फडणवीस यांच्याइतका कार्यक्षम आणि चाणाक्ष नेता नसल्याचे सर्रास म्हटले जाते. त्यामुळे देवेंद्र फडणवीस हे भविष्यात केंद्रातील महाराष्ट्राचा प्रमुख चेहरा असतील, हे जवळपास निश्चित मानले जात आहे. परंतु, काही दिवसांपूर्वीच देवेंद्र फडणवीस यांना केंद्रीय नेतृत्त्वाने उपमुख्यमंत्रीपद स्वीकारायला लावून त्यांचे पंख छाटल्याची चर्चा रंगली होती. देवेंद्र फडणवीस हे भविष्यात केंद्रातील भाजप सरकारमध्ये प्रमुख पदांसाठीचे दावेदार असू शकतात. त्यामुळे पक्षश्रेष्ठींनी त्यांना उपमुख्यमंत्रीपदावर बसवून त्यांचे राजकीय खच्चीकरण केल्याचे बोलले जात आहे.

# ४५ दिवसांत १८६ ग्रामपंचायतींच्या निवडणुका घ्या


## गोवा सरकारला सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** सर्वोच्च न्यायालयाने मुंबई उच्च न्यायालयाकडून गोव्यातील पंचायत निवडणुकासंदर्भात २८ जून २०२२ रोजी दिलेल्या निर्णयावर सुनावणी करण्यास नकार दिला. याच वेळेस न्यायालयाने गोवा सरकार आणि गोव्यातील राज्य निवडणूक आयोगाला मुंबई उच्च न्यायालयाने जारी केलेल्या आदेशानुसार आदेश निघाल्यापासून ४५ दिवसांमध्ये पंचायत निवडणुका घेण्याचे निर्देश दिलेत. न्यायालयाने सुरेश महाजन विरुद्ध मध्य प्रदेश या जुन्या प्रकरणाचा संदर्भ देत कलम २४५ ई च्या आधारे या प्रकरणी सुनावणी करण्यास नकार दिला. सर्वोच्च न्यायालयाच्या सुट्टीकालीन न्या. दिनेश महेश्वरी आणि न्या. कृष्णा मुरारी यांच्या द्विसदस्यीय खंडपीठाने हा निकाल देताना, मुंबई उच्च न्यायलयाने गोव्यासंदर्भात जारी केलेल्या या आदेशामध्ये मध्यस्थी करण्यासारखे एकही कारण आम्हाला योग्य वाटत नाहीत. हा निर्णय भारतीय संविधानातील कलम २४३ ई नुसार सविस्तर देण्यात आला आहे. तसेच न्यायालयाच्या सुरेश महाजन विरुद्ध मध्य प्रदेश राज्यासंदर्भातील निकालाप्रमाणेच निर्णय दिला गेला, असे स्पष्ट केले. मात्र त्याचवेळी न्यायालयाने गोवा निवडणूक आयोगाला गरज पडल्यास त्यांनी त्यांचे म्हणणे उच्च न्यायालयामध्ये मांडावे असेही सुचवले आहे. उच्च न्यायालयाचे आदेश जारी झाल्यापासून ४५ दिवसांमध्ये निवडणुका घेण्याचे निर्देश देण्यात आलेत. त्या निकालानुसार १० ऑगस्ट रोजी राज्यामध्ये पंचायत निवडणुका होणे अपेक्षित आहे.

उच्च न्यायालयाने नियम जिल्हा परिषद (निवडणूक कार्यपद्धती) नियम १९९६ मधील १० नियमानुसार उच्च न्यायालकडून देण्यात आलेल्या निर्देशांप्रमाणे तीन दिवसांत राज्यातील १८६ ग्रामपंचायतींच्या निवडणुकांच्या तारखांची घोषणा करण्यास सांगितले आहे. राज्य सरकारने ३० जून २०२२ रोजी यासंदर्भातील पत्रक जारी केले असून त्यानुसार १० ऑगस्टपूर्वी निवडणुका पार पडणार आहेत, असं लाइव्ह लॉ या वेबसाईटने दिलेल्या वृत्तात म्हटले. २७ डिसेंबर २०२१ रोजी गोवा राज्य निवडणूक आयोगाने सचिवांना (पंचायत) पत्र पाठवून ओबीसी आरक्षणासंदर्भातील आकडेवारीची मागणी केली. त्याचप्रमाणे सर्वोच्च न्यायालयाने विकास किसनराव गवळी विरुद्ध महाराष्ट्र राज्य प्रकरणामध्ये दिलेल्या निकालाप्रमाणे ओबीसींसाठी स्थानिक पंचायत निवडणुकांमध्ये जागा राखीव ठेवण्याआधी चाचणी करण्याचे निर्देश पत्रात देण्यात आलेले. या निर्देशानुसार पंचायतीच्या निर्देशकांनी सामाजिक न्याय आणि गोवा सरकारच्या मागासवर्गीय समितीकडे पंचायतींमधील गावांत राहणाऱ्यांपैकी ओबीसींची संख्या किती आहे याबद्दलची आकडेवारी मागवली. २५ जानेवारी रोजी राज्य निवडणूक आयोगाने याच माहितीसाठी आणखीन एक पत्र पाठवले.






विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# आनंद आणि उत्साहमुर्ती : श्री गुरुमुर्ती सर

आधुनिक केसरी

तिच्या अकाली जाण्याने सरांच्या मनावर मोठाच आघात झाला. ती गेल्यानंतर आपल्या दोन्ही मुलांना त्यांनी आईचे सुद्धा प्रेम दिले. पुनर्विवाह करणे सहज शक्य असताना आपल्या मुलांसाठी आणि पत्नीवरील अपार प्रेमामुळे त्यांनी तो केला नाही. गुरुमूर्ती सरांनी होस्पेट येथे रोटरी क्लब, लायन्स क्लबची विविध पदे भूषवली. होस्पेटला विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध व्हावी म्हणून विग्नान इंडिपेन्डन्ट कॉलेज, विकास डिग्री कॉलेज, विकास इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेन्ट या संस्थांची स्थापना केली. पुढे या संस्था उर्जितावस्थेला आणल्यानंतर त्यांनी या संस्था इतर संचालकांकडे सोपवून त्यातून निवृत्ती पत्करली. आपल्याकडे शेवटपर्यंत पदे न सोडणाऱ्या व्यक्ती पाहिल्या तर त्या पार्श्वभूमीवर त्यांचा हा त्याग उठून दिसतो. आज त्यांचा मोठा मुलगा विकास हा इंजिनिअर असून बंगलोरला एका उत्तम कंपनीत नोकरी करीत आहे तर तेजस हा बी कॉम, एम बी ए आणि ऑडिटर होऊन त्यांचा वारसा पुढे चालवतो आहे. तेजसने आम्हाला हंपी येथे फिरवून आणले आणि तेथील विविध ठिकाणांची माहिती दिली. विकास आमच्यासोबत होस्पेटच्या बाजारपेठेत आला. त्याच्या सोबतीत आम्ही थोडीफार खरेदी तिथे केली. गुरुमूर्ती सरांना मुलगी नाही. पण माझी मुलगी सारिका ही त्यांची मानसकन्या आहे. माझ्या जावयांना तेही आपला जावई मानतात. आता गुरुमूर्ती सरांनी मनाने वानप्रस्थाश्रम स्वीकारला आहे. त्यांनी व्यवहारात लक्ष घालणे हळूहळू कमी केले असून मुलांना आवश्यक तेथे मार्गदर्शन आणि मदत ते करतात. विकास आणि तेजस ही दोन्हीही तरुण मुले कमालीची आज्ञाधारक असून कोणत्याही वाईट सवयींपासून चार हात दूर आहेत. उत्तम संस्कार कसे असतात हे विकास आणि तेजस यांच्याकडे पाहिले की कळते. गुरुमूर्ती सर आणि ही दोन्हीही मुले स्वयंपाकात अतिशय तरबेज आहेत.
गुरुमूर्ती सर कुठेही गेले की त्यांच्या लाघवी आणि प्रेमळ स्वभावामुळे सगळ्यांना आपलेसे करून घेतात. जिथे गेले असतील तिथे स्वयंपाकघरात जाऊन यजमानांसाठी ते आनंदाने आणि उत्साहाने विविध प्रकारचे दाक्षिणात्य पदार्थ करून खाऊ घालतात. त्यात त्यांना कोणताही कमीपणा वाटत नाही. त्यावेळी त्यांना कोणाचेही घर अजिबात परके वाटत नाही आणि कोणालाही ते परके वाटत नाहीत. आम्ही त्यांच्याकडे असताना त्यांनी स्वहस्ते बनवलेल्या विविध पदार्थांची मेजवानी आम्हाला मिळाली. त्यांच्याकडे लावलेले दही तर अगदी अप्रतिम असायचे. त्यामुळे इतर पदार्थांसोबतच दही, ताक इ पदार्थांची छान मेजवानी आम्हाला मिळाली. भोजन बनवण्यासोबतच त्यांना अध्यात्माचीही अतिशय आवड आहे. वेद, उपनिषदे, गीता इ ग्रंथ त्यांच्या नियमित वाचनात असतात. रामकृष्ण परमहंस आणि स्वामी विवेकानंद ही त्यांची श्रद्धास्थाने आहेत. असा हा नेहमीच पाय जमिनीवर असलेला महान कर्मयोगी. त्यांचा निरोप घेताना आमचे पाय जड आणि डोळे ओले झाले होते तर त्यांचीही अवस्था काही वेगळी नव्हती. अशा या ऋणानुबंधाच्या गाठी !



## आनंदी पहाट

### आनंदी राहण्यावर लक्ष केंद्रित करावे

आधुनिक केसरी

आपल्या अंतर्मनातील आनंद हा कोणत्याही बाह्य परिस्थितीवर अवलंबून नसतो, तो आपल्या मानसिक वृत्तीवर अवलंबून असतो; अस्सल आनंद आतून येत असतो. आनंदी राहण्यासाठी आपण सुज्ञपणे निवडत असलेल्या विविध बाबींवर ठरत असते. जेव्हा आपली बाह्य परिस्थिती चांगली असते, तेव्हा आपल्याला आनंद निवडणे सोपे होऊ शकते, परंतु ते त्याचे एकमेव कारण नसते. आपल्या सभोवतालच्या गोष्टी आपल्या मनासारख्या नसल्या तरीही आपण आनंदी राहू शकतो. आनंद हा सर्वात महत्वाचा अनुभव असतो, आपण आपल्यावर प्रेम करतो, ज्यांच्यावर आपण प्रेम करतो, जे आपल्यावर मनापासून निरपेक्षपणे प्रेम करतात; त्यांतूनच खरा आनंद मिळत राहतो. आपण जे काही प्रयत्न, काम करत असतो, त्यात आपल्याला नेहमी आनंदी राहायचे असते आणि आपले आप्तेष्ट, मित्रपरिवार, सगेसोयरे, आपल्या सभोवतालचे लोक आनंदी असावेत, असेही वाटत असते. आपल्याला बरे वाटण्यापेक्षा आपल्यामुळे अनेकांना विविध कारणांसाठी आनंदी राहता यावे, असे काहीतरी करणे जरुरीचे असते, कारण प्रत्येकालाच आपापल्या जीवनात आनंदाची गरज असते. काहीवेळा तणावपूर्ण नातेसंबंधांमुळे आपल्याला आनंद मिळतोच असे नाही, तरीही निरोगी वातावरण तसेच आश्वासक नातेसंबंध महान आणि चिरस्थायी आनंद देऊ शकतात. नातेसंबंध कौशल्यांवर लक्ष केंद्रित करणे, प्रियजनांसोबत वेळ घालवणे आणि इतर मार्गांनी हे नातेसंबंध जोपासणे आपल्याला आपल्या जीवनात आनंदाचे हे स्वरूप ठेवण्यास मदत करू शकते. इतरांना आनंदी करण्यापूर्वी स्वतःसोबत आपण आनंदी राहण्यावर लक्ष केंद्रित करण्याचा मुख्य आणि सर्वात महत्त्वाचा फायदा म्हणजे आपल्याला आपली स्वतःची किंमत कळू शकते, आपले सामाजिक संबंध आणि सामाजिक स्थान समजून घेता येते, स्वतःच्या आणि इतरांच्या जीवनाकडे बघण्याच्या दृष्टीकोनाच्या महत्वपूर्ण बाबी आपल्याला स्पष्ट होतात.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

### होईल उध्दार | हरिनामे ||

मनी भाव ज्याच्या | निस्सिम जडला ||
तोचि आवडला | विठ्ठलाशी ||१||

अंतर्बाह्य स्वच्छ | शुभ्रपट झाला ||
त्याने जाळीयेला | अहंकार ||२||

विकार तापाची | सुटता रे आस ||
होती त्याचे दास | रात्रंदिन ||३||

स्थितप्रज्ञ अंगी | जडता सद्गुण ||
नांदतो निर्गुण | त्याचे ठायी ||४||

माझ्या मना जाण | व्यर्थ हा संसार ||
होईल उध्दार | हरिनामे ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## "नीतिशतक निरुपण"

आधुनिक केसरी


**या साधूंश्च खलान् करोति विदुषो मूर्खान् हितान् द्वेषिणः**
**प्रत्यक्षं कुरुते परोक्षममृतं हालाहलं तत्क्षणात् ।**
**तामाराधय सत्क्रियां भगवतीं भोक्तुं फलं वाञ्छितं**
**हे साधो व्यसनैर्गुणेषु विपुलेष्वास्थां वृथा मा कृथाः ।।**

**अर्थ :** हे सुजन, ती सत्क्रियाच आहे, जी क्षणात दुष्टाला सज्जन, मूर्खास विद्वान, शत्रूंना हितकारी, अप्रत्यक्ष वस्तूंना प्रत्यक्ष आणि विषाला अमृत करविते. जर तुम्हाला मनोवांछित फलाच्या लाभाची इच्छा बाळगत असाल, तर केवळ परिश्रमपूर्वक प्राप्त केल्या जाणा-या गुणांविषयी आस्था बाळगू नका. भगवती ऐश्वर्यस्वामिनी अशा सत्क्रियेची अर्थात सत्कर्माची आराधना करा. माणसाने नेहमी सत्कर्म करावे, तेच प्रभावी आणि जीवन जगण्यास सहकार्यकारी ठरते, असे प्रतिपादन येथे सम्राट भर्तृहरींनी केले आहे.



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

## ।। दासबोध स्तवन ।।



### मायोद्भव निरूपण

आधुनिक केसरी

मायेचा पसारा खुपच मोठा आहे. त्यात किती गुंतायचे व कुठे गुंतवणूक करायची हे जाणते व विचारी लोक शोधून काढतात. 'मी' या विनाशी त्वाची एकदा का तुमची ओळख झाली तर हा मायेचा पसारा किती वरवरचा आहे हे लक्षात येते.पण आपण तर संतांच्या विचारांनी भारावलेले लोक आहोत. तेव्हा मायेचा स्तंभ जेवढा म्हणून ऊंच नेता येईल तेवढा ऊंच नेत रहावा. कारण संतांच्या जवळ आपपरधर्म नसतो. तो कधीही सुखःदुःखाच्या तराजूत माया मोजत नाही. त्याच्या साठी तर सगळे"एकराळती" असतात.आपणही तसेच असावे ही तर समर्थांची शिकवण आहे. आपण सर्व जण त्याच तत्वावर चालले पाहिजे.
तर वीसाव्या ओवीत समर्थ म्हणतात की सर्व विनाशी तत्वे एकदा का विरली म्हणजे हा देहच मी आहे ही भावना संपते. निर्गुण ब्रम्हाशी केवळ विवेकाने जीवाला ऐक्य साधता येते. बुद्धीच्या जोरावर देहाचा शोध घेतला तर एका विनाशी तत्वाने दुसरे विनाशी तत्व संपते आणि देहबुध्दीच्या मी पणाला तिथे काहीच किंमत रहात नाही. आपण आपल्या स्वतः चा शोध घेऊ लागलो तर"आपण"अगदी भ्रमात्मक आहोत किंवा मिथ्या आहोत हे समजते. अशा रीतीनें तत्वांचा निरास झाला कीं अखेर शुध्द व खरें निर्गुण निराकार ब्रम्ह तेवढे शिल्लक रहाते म्हणजेच यासर्व ओव्यांचा अभ्यास केला असता असे लक्षात येते की मायेचा पसारा कसा वाढवावा व कसा जोपासावा हे प्रत्येकाच्या चिंतनाचा विषय आहे. आता बघा हं देहाहंता( मी पण )किंवा मिथ्या मी विराम पावून जे उरते ते निर्गुण ब्रम्ह होय। आणि आत्मसमर्पणाचे खरे रहस्य हेच आहे. कारण विनाशी तत्वे विरली कीं मी--तूं पणाची बोळवण होते. मी म्हणून वावरणाऱ्या अहंकाराचा शोध घेतला तर तो सापडत नाही. निर्गुण ब्रम्ह आहे तसेच रहाते. आपण सर्व जण आपापल्या परीने सद्गुरूच्या मार्गदर्शनाचा लाभ घ्यावा. मायोद्भवनिरूपण हा समास खुप खोलवर जाऊन विचार करायला लावणारा समास आहे. सगळ्या विश्वामध्ये तत्व कोणते व भ्रम कोणता,अस्सल कोणते नकली कोणते याचा शोध घेतला म्हणजे जे भ्रमरूप आणि नकली आहे ते खरे पहाता टिकत नाही ते वरवरचे असल्या कारणाने लगेच नाहीसे होते. **(क्रमशः)**



सौ. उज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

## रंग वारीचे

आधुनिक केसरी

आषाढी वारी ( पंढरपूर ) म्हणजे वारकरी भक्तांनी आषाढी एकादशीनिमित्त पंढरपूर पर्यंत केलेली पदयात्रा होय. वारकरी संप्रदायम्हणजे पंढरपूर येथील विठ्ठलाच्या वारीला जाणाऱ्या लोकांचा संप्रदाय! या संप्रदायाचे एक महत्त्वाचं वैशिष्ट्य म्हणजे आषाढी वारी! या वारीमध्ये अनेक वारी हा एक आनंद सोहळा असतो. दोन वर्षांच्या प्रतिक्षेनंतर यंदा लवकरच पंढरपुरची वारी होणार आहे. कोरोना महामारीमुळे दरवर्षी निघणारी पंढरपुरची मागील दोन वर्षांपासून खंडीत झाली होती. लसीकरणामुळे सध्या कोरोना आटोक्यात आला आहे, त्यामुळे यंदा होणाऱ्या वारीमुळे पंढरपुरच्या विठुरायाचे दर्शन घेण्याचे वेध सर्व वारकऱ्यांना लागले आहेत. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर यंदाच्या आषाढी वारीत सहभागी होणाऱ्या प्रत्येक वारकऱ्याला वैयक्तिक पातळीवर बंधने पाळावी लागणार आहेत. तसेच वारीच्या नियोजनाचे आव्हानही प्रशासनासमोर असणार आहे.
वारीपूर्वी आणि वारीनंतर पंढरपूरकरांना खूप गोष्टींना सामोरे जावे लागते. मायबापा पांडुरंग रखुमाईमुळेच पंढरपूर आहे. आज जे खातो, पितो, जगतो ते केवळ पांडुरंगामुळेच ! येणाऱ्या लाखो वारकऱ्यांमुळेच गावची शोभा वाढते, कारभार होतो, वाढतो. कोरोनासारख्या रोगाने खूप खूप शिकवलं. माणूसपण जपलं, गमावलं. न भरून निघणारी पोकळी निर्माण झाली.
वारी खूप काही शिकविते. खरंतर वारकरी संप्रदाय हा शिस्तप्रिय आहे. त्यामुळे यंदाच्या वारीत वारकरी आरोग्यासंदर्भात बंधने पाळतील, अशी अपेक्षा अन् खात्री आहे. यंदा वारी दोन वर्षांनी भरणार आहे.
वारीत होणारी अन्नाची नासाडी, अस्वच्छता, जपली जाणारी, माणूसकी, अनुभव यावर काही छोट्या छोट्या स्वरूपात मांडण्याचा प्रयत्न करणार आहे. रोज एक लघुकथा, लेख, अलक असे स्वरूप आहे. कसे झाले प्रतिक्रिया नक्की कळवा.

**-सौ आरती राजाराम परिचारक, पंढरपूर.**



भेटी लागी जीवा... भाग : 2



# वारीत अनुभवलेला अंतरंगातील अवर्णनीय अनुभव

आधुनिक केसरी

महाराष्ट्रातील एकमेव आणि अद्वितीय वारी म्हणजे आमचे आदर्श असे अढळ श्रद्धास्थान आहे. या वारीतून आम्हाला अद्वितीय अशा प्रकारचे सूत्रे मिळालेले आहे. वारकऱ्यांच्या अफाट गर्दीपुढे सर्व काही पिके पडते. माऊलींच्या मुक्काम स्थळापासून बरेच दूरवर पुढे जाऊन आम्ही थांबलो होतो. तेवढया रात्री माऊलींची आरती झाली. रात्रीच्या वेळेस चालत असलेल्या वारकऱ्यांत खूप थकलेला वारकरी काठी टेकत टेकत..राम कृष्ण हरी... पांडुरंग हरी .. म्हणत हळूहळू चालत होता. आम्ही त्याच्याजवळ जाऊन अत्यंत आपुलकीने त्यांची विचारपूस केली. त्यांना खूप ताप आला होता. त्यांना दम लागत होता आणि ते धापा टाकत होते. मी म्हटले माऊली तुम्हाला खूप ताप आहे. तुमच्यासोबत कोणी दिसत नाही. खोकलाही खूप जाणवतोय. तब्येत साथ देत नसताना कशाला दिंडीत आलात. चला डॉक्टरकडे जाऊ. नाही तर काहीतरी आघटीत होऊन बसेल. माझे वाक्य संपण्याआधीच ते अडखळत म्हणाले... नको ते काय होईल? काय अघटीत घडेल? मरणच येईल ना ? मरणाचीच तर वाट बघतोय... ये म्हणाव त्या मरणाला.... आणि ने म्हणावं मला... ज्ञानोबारायांच्या दिंडीत तुम्हा वारकऱ्यांच्या सहवासात मला मरण आले तर जीवनाचा उद्धारच होईल. म्हणूनच दिंडीत आलो असे ते ठामपणे सांगत होते. संत नामदेव महाराजांच्या



डॉ. विजयकुमार फड

**'अंतकाळी मी परदेशी**
**ऐसे जाणूणीया मानसी**
**म्हणून ऋषिकेशी,**
**शरण तुझ्याशी मी आलो...'**

या अभंगाप्रमाणे ही माऊली बोलत होती. प्रत्येक वारकरी फक्त भेटीसाठी असुसलेला असतो. तन- मन-धन सारे विसरून तो आसक्तीची जिवापाड ओढ त्याला लागलेली असते. प्रसंगी मृत्यूलाही न घाबरणारे अनेक वारकरी डोळ्यासमोर तरळून जातात. मृत्यूसमयी कोणीच कोणाचे नसते. एकट्यालाच इथले सर्व काही सोडून जावे लागते. मृत्यू समयी भगवंताला शरण जाण्याची सद्‌बुद्धी सूचणे तसेच संताचा सहवास लाभणे हे भाग्यचे लक्षण असते. जळी, काष्टी ,पाषाणी सर्वत्र भगवंताचे अस्तित्व मानणाऱ्या वारकऱ्यांनी दिंडीतच देव आहे. तेथेच मृत्यू यावा असं म्हणणं संयुक्तिक नव्हे असे मी म्हणेन.

विशेष म्हणजे दिंडीत मृत्यू येईलच असेही नाही. माझे बोल त्या माऊलीला पटले. म्हणून ते दवाखान्यात यायला तयार झाले. आम्ही त्यांची पुरेशी काळजी घेतली. मृत्यूलाही हा न आवडणारा विषय असला तरी तो मागूनही मिळत नाही. आपले आचार- विचार जरी ज्ञानोबा तुकाबादी संतांच्या आचार विचाराशी जुळवले आणि त्याप्रमाणे वागत गेलो तरी आपल्याकडून पंढरीची वारी झाली असे समजण्यास काहीच हरकत नाही. आणि हेच वारीच्या अंतरंगात बांधलेले भक्कम सूत्र दडलेले आहे.

**शब्दांकन : बाळासाहेब जोगदंड औरंगाबाद**

# गडचिरोलीचा पहिला-वहिला पायलट

## हितेश सोनटक्केची 'फ्लाईंग ऑफिसर' म्हणून निवड

आधुनिक केसरी न्यूज

**गडचिरोली :** देशात मागास जिल्हा म्हणून ओळख असलेल्या गडचिरोलीच्या मातीत जन्म घेतलेला हितेश सोनटक्के हा तरूण आता भारतीय हवाई दलाच्या फायटर प्लेनमधून आकाशात उंच झेप घेणार आहे. केंद्रीय लोकसेवा आयोगाकडून घेण्यात आलेल्या सीडीएस (कंबाईंड डिफेन्स सर्विसेस) परीक्षेत देशातून चौथ्या क्रमांकाने तो उत्तीर्ण झाला आहे. हैदराबाद येथे प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर तो हवाई दलात 'फ्लाईंग ऑफिसर' म्हणून रूजू होणार आहे.

हितेशने बी.टेक (सिव्हिल) ही पदवी घेतली आहे. शालेय जीवनापासूनच त्याच्यावर भारतीय वायुसेनेचा प्रभाव होता. बारावीनंतर तो एनडीएची परीक्षाही उत्तीर्ण झाला होता. पण मुलाखतीत त्याला अपयश आले मात्र, त्यामुळे खचून न जाता त्याने बी. टेक. पूर्ण केल्यानंतर सीडीएसची परीक्षा चांगल्या गुणांनी उत्तीर्ण करत आपले ध्येय गाठले. भारतीय हवाई दलात अधिकारी म्हणून



रुजू होणारा हितेश गडचिरोली जिल्ह्यातील एकमेव तरूण आहे. त्यामुळे तो सर्वांसाठी प्रेरणास्थान ठरणार आहे. हितेश हा चामोर्शी तालुक्यातील मालेर चक येथील प्रतिष्ठित व्यापारी दिवंगत जनार्दन कुकडे यांचा नातू आहे.

चामोर्शी तालुक्यातील मालेर चक या गावात त्याचे वडील मुरलीधर सोनटक्के यांचं मेडिकल स्टोअर आहे. गावात कॉन्व्हेंट स्कूल नसल्याने त्यांनी हितेशला घोट येथील महात्मा गांधी कॉन्व्हेंट स्कूल मध्ये टाकले. चौथ्या वर्गापर्यंत तिथे शिक्षण झाल्यानंतर त्याने दहावी आणि बारावीचे शिक्षण नागपूर येथे घेतले. हितेशला इयत्ता दहावीच्या परीक्षेत ९६ टक्के गुण होते. त्यामुळे घरच्यांना हितेशकडून फार मोठ्या अपेक्षा होत्या. जिद्द आणि ध्येय समोर ठेवून बारावीच्या परीक्षेत त्याने अपेक्षित ९७ टक्के गुण प्राप्त करून यशोशिखर गाठले. त्यानंतर पुणे येथील एमआयटी कॉलेजमधून सिव्हिल इंजिनिअरिंगची पदवी घेतली.

यादरम्यान त्याने एनसीसीच्या एअर विंगमधून 'सी' सर्टिफिकेट परीक्षा ही उत्तीर्ण केली. स्किट शूटिंगमध्ये तो देशभरातील कॅडेट्समध्ये पहिला आला होता. हितेशने सिडीएस आणि एएफसीएटीची परीक्षा दिली. यामध्ये त्याने भारतातून चौथा व महाराष्ट्रातून पहिला क्रमांक मिळवत भारतीय वायुसेनेत 'पायलट' या पदावर नियुक्त झाला. हितेश सोनटक्के गडचिरोली जिल्ह्यातील पहिला पायलट ठरला आहे. हितेश ची पायलट पदावर नियुक्ती झाल्याबद्दल सर्व स्तरावरून अभिनंदन केले जात आहे.

# सेनेनंतर काँग्रेसमध्ये भूकंप, विधानपरिषदेत क्रॉस व्होटिंग करणाऱ्या ७ आमदारांवर कारवाई होणार?

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेचे ३९ आमदार फोडून उद्धव ठाकरे यांना धक्का दिल्यानंतर महाराष्ट्राच्या राजकारणात मोठी उलथापालथ पाहायला मिळाली होती. एकनाथ शिंदे यांच्या बंडामुळे शिवसेना अक्षरशः खिळखिळी झाली होती. यामुळे झालेला राजकीय धुरळा खाली न बसतो तोच आता काँग्रेस पक्षात मोठा भूकंप होण्याची शक्यता आहे. नुकत्याच झालेल्या विधानपरिषद निवडणुकीत काँग्रेस पक्षाच्या ७ आमदारांनी गुप्तपणे क्रॉस व्होटिंग केल्याची माहिती पुढे आली आहे. या ७ आमदारांवर पक्षाने कारवाई करावी, अशी मागणी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी केली आहे.

पृथ्वीराज चव्हाण यांनी काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी एच.के. पाटील यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी हा सारा तपशील त्यांच्यापुढे मांडल्याचे समजते. विधानपरिषद निवडणुकीत चंद्रकांत हंडोरे हे काँग्रेस पक्षाचे पहिल्या पसंतीचे उमेदवार होते. मात्र, या निवडणुकीत त्यांचा पराभव झाला होता. चंद्रकांत हंडोरे यांना महाविकास आघाडीतील मित्रपक्षांच्या आमदारांनीही मतदान केले होते. त्यामुळे विधानपरिषद निवडणुकीत वरकरणी काँग्रेसची तीन मतं फुटल्याचे दिसत असले तरी काँग्रेसची प्रत्यक्षात ७ मते फुटल्याचे समोर आले होते. ही अत्यंत गंभीर बाब आहे. त्यामुळे क्रॉस व्होटिंग करणाऱ्या ७ आमदारांवर पक्षाने कठोर कारवाई करावी, अशी मागणी पृथ्वीराज चव्हाण यांनी केली. त्यामुळे आता एच.के. पाटील दिल्लीत जाऊन हायकमांडकडे काय अहवाल देणार आणि त्यानंतर सोनिया गांधी कठोर पाऊल उचलणार का, हे पाहावे लागेल.

विधानसभेत शिंदे-फडणवीस सरकारकडून मांडण्यात आलेल्या विश्वासदर्शक ठरावावेळी काँग्रेसचे अनेक आमदार गैरहजर होते. मतदान प्रक्रिया सुरु झाल्यावर सभागृहाचे दरवाजे बंद करण्यात आले होते. काँग्रेसचे नेते याठिकाणी उशीरा पोहोचल्यामुळे त्यांना सभागृहात प्रवेश मिळाला नव्हता. त्यामुळे विश्वासदर्शक ठरावाच्या विरोधात मतदान करताना महाविकास आघाडीची केवळ ९९ मतं नोंदवली गेली होती. इतक्या महत्त्वाच्या क्षणीही काँग्रेसचे प्रमुख नेते निष्काळजीपणे वागल्याने अनेकांनी संशय व्यक्त केला होता. विश्वासदर्शक ठरावावेळी गैरहजर राहणाऱ्या नेत्यांमध्ये अशोक चव्हाण आणि विजय वडेट्टीवार यांचाही समावेश होता. विशेष म्हणजे विश्वासदर्शक ठराव मंजूर झाल्यानंतर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शिंदे-फडणवीस सरकारला मदत करणाऱ्या 'अदृश्य हातांचे' आभार मानले होते. पृथ्वीराज चव्हाण यांनी हा प्रकार अत्यंत गंभीर असल्याचे मत प्रभारी एच.के. पाटील यांच्याकडे नोंदवले आहे.

# कविता वनकर यांना आचार्य पदवी

आधुनिक केसरी न्यूज

**यवतमाळ :** पांढरकवडा पंचायत समितीअंतर्गत



येणाऱ्या कौंधारा येथील जिल्हा परिषदेच्या कनिष्ठ प्राथमिक शाळेतील सहायक शिक्षिका कविता शंकर वनकर कांबळे यांनी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाची मराठी विषयातील आचार्य पदवी प्राप्त केली. थेरीगाथाच्या आधारे आधुनिक मराठी साहित्यातील स्त्रीवादाचा तौलनिक अभ्यास हा त्यांच्या संशोधनाचा विषय होता.

अमरावती येथील डॉ. सुखदेव ढाणके यांच्या मार्गदर्शनात त्यांनी संशोधनकार्य पूर्ण केले. कविता वनकर कांबळे यांचे राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरांवरील परिषदांमध्ये शोधनिबंध प्रसिद्ध झाले आहेत. त्या आपल्या यशाचे श्रेय त्यांचे पती प्रा. डॉ. विश्वजित कांबळे, मार्गदर्शक आणि त्यांच्या मुलांना देतात.

# अल्पवयीन मुलीवर ट्रॅव्हल्समध्येच अत्याचार

आधुनिक केसरी न्यूज

**अंबाजोगाई :** येथील ऐका अल्पवयीन मुलीस लग्नाचे अमीष दाखवून तिला मनेखाँ आसेफ खाँ पठाण याने पुणे येथे पळवून नेत असताना चक्क ट्रॅव्हल्स मध्येच तिच्यावरती अत्याचार केला. एवढे करून तो थांबला नाही तर त्याने त्या मुलीला आपल्या पुणे येथील नातेवाईकांकडे घेऊन दोन दिवस राहिला. तेंव्हा तिथेही त्याने सलग दोन दिवस त्या मुलीवरती अत्याचार केला.

तिसऱ्या दिवशी पिडीता परत आली तेंव्हा तिची अवस्था पाहून आईला संशय आल्याने आईने तिला जवळ घेऊन, विश्वासात घेऊन विचारपूस केली असता पिडीतेने आपल्या आईला सर्व माहिति सांगितली. आणि माझ्यासोबत मनेखाँ याने तीन-चार वेळा अतिप्रसंग तथा बलात्कार केल्याचे हे आईला सांगितले. मुलीच्या आईच्या सांगण्यावरून मनेखां आसिफ खां पठाण यांच्या विरोधात अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात बलात्काराचा गुन्हा नोंद झाला असून त्याला अटकही झाली आहे. पोलीस निरीक्षक बाळासाहेब पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पुढील तपास करत आहेत.

# विविध घटनेत तिघांची आत्महत्या

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** साक्री तालुक्यातील ढोली पाडा येथे राहणाऱ्या वसंत आनंदा राठोड या ४५ वर्षीय इसमाने शाह यांच्या मेन गेटच्या लोखंडी अँगलला गळफास लावून घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. दुसऱ्या घटनेत मोहाडी उपनगरातील अभिषेक राजेश पाटील या सव्वीस वर्षे तरुणाने घरात गळफास लावून घेत आत्महत्या केली. तिसऱ्या घटनेत वणी येथे मनीषा उत्तम मोरे या १७ वर्षीय युवतीने काल सकाळी घराच्या मागील बाजूस असलेल्या लिंबाच्या झाडाला ओढणी बांधून त्याचा गळफास लावून आपले जीवन संपविले.

# मुसळधार पावसामुळे नदीपात्रात अडकले १० शेतकरी



आधुनिक केसरी न्यूज

**भंडारा :** राज्यात सर्वदूर पाऊस झाला आहे. विदर्भातही मुसळधार पावसाने हजेरी लावली आहे. अशात भंडारा जिल्ह्याच्या लाखांदूर तालुक्यातून वाहणाऱ्या चुलबंद नदीच्या पात्राच्या पाण्यात सकाळी अचानक वाढ झाली. या दरम्यान होडीने नदी ओलांडत असलेले दहा शेतकरी यात अडकले. नाविकाच्या प्रसंगावधानामुळे सर्वांना सुखरूप नदीतिरावर सोडल्याने मोठा अनर्थ टळला आहे.

आवळी हे गाव वैनगंगा व चुलबंद नदीने व्यापले आहे. त्यामुळे या गावाचा पुनर्वसन करण्यात आले. मात्र, बुडीत गावात शेती असल्यामुळे शेती कामाकरिता शेतकरी चुलबंद नदीतून ये-जा करत असतात. रोजप्रमाणे सकाळी १० शेतकरी आपल्या शेतात जाण्यासाठी होडीने नदी ओलांडण्याकरिता निघाले. होडी तीरापासून काही अंतरावर गेलीच होती की पाण्याची पातळी अचानक वाढली आणि होडी बुडू लागली.

आपल्या होडीने १० शेतकरी बुडतील हा विचार येताच नावाडी नारायण कुंभरे यांनी मोठ्या शिताफीने होडीला नदीपात्रातील एका मोठ्या दगडाला अडकवलं. सगळे जवळपास तासभर या दगडावर अडकून राहिले. नदी तिरावर असलेल्या लोकांनी दुसऱ्या मोठ्या डोंग्याच्या माध्यमातून नदीपात्रात अडकलेल्या सर्व दहा पुरुष महिला शेतकऱ्यांना सुखरूप नदिपत्राबाहेर काढले. नावाडाच्या प्रसंगावधनामुळे मोठा अनर्थ टळल्याने पुरात अडकलेल्यांनी सुटकेचा श्वास सोडला.



# नक्वींचा राजीनामा

आधुनिक केसरी

मुख्तार अब्बास नक्वी यांनी मोदी सरकारमधील केंद्रीय मंत्रिपदाचा राजीनामा दिला आहे. अल्पसंख्याक विभागाची धुरा सांभाळणाऱ्या नक्वी यांच्या राज्यसभेतील खासदारकीचा कार्यकाळ उद्या संपणार आहे. त्याच्या आदल्याच दिवशी त्यांनी मंत्रिपदाचा राजीनामा सादर केला आहे. त्यानंतर उपराष्ट्रपतीपदासाठी भाजपकडून त्यांचे नाव निश्चित झाल्याची माहिती समोर येत आहे. आजच्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नक्वींच्या योगदानाचे कौतुक केले होते. भाजपच्या राज्यसभेच्या उमेदवारी यादीतून नक्वींचे नाव वगळण्यात आले होते. संसदेच्या कोणत्याही सभागृहाचा सदस्य नसताना केंद्रीय मंत्री केवळ सहा महिन्यांच्या कालावधीसाठी कामकाज पाहू शकतात. मात्र त्याआधीच नक्वींनी मंत्रिपदाचा राजीनामा दिल्याने आश्चर्य व्यक्त केले जात होते. उत्तर प्रदेशातील रामपूर लोकसभा पोटनिवडणुकीसाठी भाजप त्यांना उमेदवार म्हणून रिंगणात उतरवणार असल्याची चर्चा होती, मात्र ती प्रत्यक्षात उतरली नाही. त्यामुळे आता नक्वींना उपराष्ट्रपतीपदासाठी भाजप रिंगणात उतरवण्याची शक्यता वाढली आहे. भाजपकडे पुरेसे संख्याबळ असल्याने एनडीएचे उमेदवार म्हणून नक्वींना तिकीट मिळाल्यास यूपीएच्या तुलनेत त्यांचे पारडे जड ठरु शकते. हिंदुत्ववादाची विचारधारा असलेल्या भाजपमध्ये मोजकेच मुस्लिम नेते आहेत. त्यात मुख्तार अब्बास नक्वी यांचे नाव वरच्या यादीत येते. राज्यसभेचे उपाध्यक्ष म्हणून त्यांनी काम केले आहे. भाजपने दोनवेळा त्यांना राज्यसभेवर पाठवले. २०१० ते २०१६ या कालावधीत त्यांनी राज्यसभेत उत्तर प्रदेशचे प्रतिनिधीत्व केले. त्यानंतर त्यांना झारखंडमधून राज्यसभेवर पाठवण्यात आले. नक्वी मूळचे उत्तर प्रदेशचे आहेत. ते सध्या ६४ वर्षांचे आहेत. आणीबाणीच्या काळात नक्वी यांनी तुरुंगवास भोगला. त्यावेळी ते १७ वर्षांचे होते. विद्यार्थी दशेत असताना ते जनता पक्षात सक्रीय होते. ८० च्या दशकात त्यांनी जनता पक्षाच्या तिकिटावर विधानसभा निवडणूक लढवली. मात्र ते अपयशी ठरले. १९८० मध्ये त्यांनी अपक्ष म्हणून लोकसभेची निवडणूक लढवली. १९९८ मध्ये ते लोकसभेवर निवडून गेले. अटल बिहारी वाजपेयींच्या सरकारमध्ये ते राज्यमंत्री होते. त्यांच्याकडे माहिती आणि प्रसारण मंत्रालयाची जबाबदारी होती. आज सकाळी नक्वी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजप अध्यक्ष जेपी नड्डा यांची भेट घेतली. नक्वी आणि राजनाथ सिंह हे पंतप्रधान मोदींच्या सरकारमधील दोनच मंत्री आहेत, जे अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखालील भाजप सरकारमध्येही होते. निलंबित प्रवक्त्या नुपूर शर्मा यांच्या वादग्रस्त वक्तव्य प्रकरणानंतर भाजप डॅमेज कंट्रोल करण्यासाठी उपराष्ट्रपती पदी अल्पसंख्याक चेहरा देण्याची शक्यता आहे.



प्रा. शिवाजी वाठोरे

# सत्तानाट्यात सामान्य माणूस कुठे ?

आधुनिक केसरी

**महाराष्ट्राच्या राज्यपाल महोदयांनी एकनाथ शिंदे यांची मुख्यमंत्रीपदी निवड होताच त्यांना आनंदाने पेढा भरविला. आनंद होणे साहजिक आहे. पण त्या आधी उद्धव ठाकरे मुख्यमंत्री झाले तेव्हा अशी सुबुद्धी राज्यपालांना सुचली नाही. मुळात राज्यपाल हे पद संवैधानिक आहे, राज्यपाल राज्याचे असतात, कोणत्याही राजकीय पक्षाचे नव्हे. त्याची गरिमा सांभाळायलाच हवी, असे वाटते.**

सुमारे दीड-दोन आठवड्यांच्या सत्तांतर वाटल्यानंतर एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील सेना गट आणि भारतीय जनता पक्षाच्या युतीने सरकार स्थिरस्थावर झाले.' याचसाठी केला होता अट्टाहास' हे भाजपाची एकूण रणनीती बघता अगदी तंतोतंत खरे ठरले आहे. पण त्यासाठी केवढा द्रविडी प्राणायाम करावा लागला ! सेनेच्या बंडखोर आमदारांची केवढी बडदास्त ठेवावी लागली ! मुंबई ते गोवा व्हाया सुरत व्हाया आसाम. त्यासाठी लागणारा हजारो कोटींचा खर्च आमदारांचा घोडेबाजार आणखी वेगळा विषय आहे. हे सगळं करून, सेनेत फूट पाडून हाती काय लागले तर देवेंद्र फडणवीस यांना उपमुख्यमंत्रीपदी विराजमान व्हावे लागले. 'खोदा पहाड निकला चुहा' अशातलीच गत म्हणावी लागेल. आता काही भक्त मंडळी जरूर म्हणतील की, "फडणवीसजींचा किती हा त्याग" वरिष्ठांचा आदेश येताच किंचितही " कांकू" न करता उपमुख्यमंत्रीपद स्वीकारले. पण दिल्लीश्वराकडे त्यांची काय प्रतिमा आहे, हे या निमित्ताने संपूर्ण महाराष्ट्रासह देशाने पाहिले. "मी पुन्हा येईन, मी पुन्हा येईन" अशा मोठमोठ्या घोषणा देणाऱ्या माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीससारख्या अत्यंत हुशार, बेरकी आणि अनुभवी नेत्याने निमुटपणे वरिष्ठांनी दिलेल्या आदेशाचे पालन करावे, हा तसा भाजपचा शिरस्ता. अहो, सरपंच राहिल्यावर कोणी उपसरपंच होतंय काय? देशात एखादे तरी उदाहरण असे सापडेल काय? मात्र, एक बाब यात प्रकर्षाने जाणवते की, काही दिवस एकनाथ शिंदे यांचा वापर करायचा आणि जेव्हा वेळ येईल तेव्हा महाराष्ट्रासह देशातील हिंदुत्वाचा मुद्दा हायज्याक करायचा. आमच्या पक्षाशिवाय हिंदुत्वाचा पालनहार कोणीच नाही, असे सामान्य जनतेच्या मनावर पक्के बिंबवण्यात काही प्रमाणात भाजपाला आजच यश आले आहे. ते २०२४ च्या सार्वजनिक निवडणुकीपर्यंत शतप्रतिशत "टार्गेट"पूर्ण करायची त्याची रणनीती आहे. मुख्यमंत्री शिंदे हे त्यांच्या महाजाळात अडकले आणि आयतेच भाजपाला कोलीत मिळाले. इतिहासाची पुनरावृत्ती होत असते असे म्हणतात. इतिहासात नानासाहेब फडणवीसांनी महादजी शिंदे यांचा असाच वापर करून घेत सत्ता आपल्या ताब्यात ठेवली होती. आजही सत्तानाट्याच्या सारिपाटात फडणवीस आणि शिंदे यांची नावे आहेतच. हा योगायोग जरी असला तरीही १९६० ला द्विभाषिक राज्य स्थापन झाले तेव्हा मराठी भाषिक असूनही विदर्भ मध्यप्रदेशचा भाग होता. तेथील जनता महाराष्ट्रात



विलीन होण्यास अनुकूल नव्हती. गुजरात आणि महाराष्ट्र निर्मितीवरून खूप मोठा वाद झाला होता. अनेक आंदोलने झाली. आंदोलकांवर गोळीबार करण्यात आला. यात दीडशेच्या वर आंदोलकांचे बळी गेले. शेवटी मराठी भाषिक विदर्भ प्रांत वगळून आणि गुजराती भाषिक राजकोटच्या उत्तरेकडील प्रांत वगळून द्विभाषिक राज्य निर्माण करण्यात आले. मोरारजी देसाई मुख्यमंत्रीपदी होते तर या राज्याची राजधानी होती मुंबई. केंद्राने हा निर्णय मराठी भाषिकांवर लादला होता. गुजराती भाषिक मुख्यमंत्री लादला होता. त्या विरोधात लोक संयुक्त महाराष्ट्रासाठी आंदोलने करीत होते. दीडशेच्या वर आंदोलकानी त्यात आपले प्राण गमावले. दरम्यान, आंदोलनाचा परिणाम म्हणून नेहरूजीनी मोरारजींना बदलून मुख्यमंत्री पद यशवंतरावजी चव्हाण या मराठी भाषिकास दिले. विदर्भवासीयांना समजावण्यात यशवंतरावजी यशस्वी झाले. विदर्भ महाराष्ट्रात तर गुजरात नवीन स्वतंत्र राज्य निर्माण झाले. मुंबई महाराष्ट्रात आली. पुढे बाळासाहेब ठाकरे यांच्या अभ्यासू आणि आक्रमक नेतृत्वाखाली मराठी भाषिक एकत्र आले. मराठी आस्मिता मोठ्या प्रमाणावर चर्चिली जाऊ लागली. शिवसेना मजबूत बनली. मुंबई आपल्या ताब्यात ठेवायची हे गुजरातचे स्वप्न भंगले ते कायमचे. जोपर्यंत शिवसेना आहे तोपर्यंत मुंबई आपल्या ताब्यात येऊ शकत नाही हे गुजरातवासीयांनी जाणले. मुंबई हातातून निसटली. जी देशाची आर्थिक राजधानी आहे ती आपल्या ताब्यात असावी हे प्रधानमंत्री आणि गृहमंत्री ह्यांना वाटणे साहजिकच आहे. कारण दोघेही गुजरातचे आहेत. त्यासाठी शिवसेना फोडणे हा एकमेव पर्याय वाटणेही साहाजिकच आहे. थंड डोक्याने हा "प्लान" केलेला आहे, असे म्हणणे अतिशयोक्तीचे ठरणार नाही.

पुढे केंद्रात भाजपाची एक हाती सत्ता आल्यास महाराष्ट्राची तीन भागात विभागणी करण्याचे आणि त्यात मुंबई गुजरातच्या घशात घालण्याचे षडयंत्रही अपेक्षित आहे. अथवा उद्या भविष्यकाळात मुंबई केंद्रशासीत प्रदेश झाल्यास नवल वाटू नये. यात सर्वसामान्य माणसांसाठी आम्ही संघर्ष करीत असल्याचे कोणत्याही राजकीय पक्षाने सूतोवाच केलेले नाही. शेतकऱ्यांचे, बेरोजगारांचे, नोकरीतील बाढतीचे, मुंबईवासीयांचे अनेक प्रश्न आहेत. दलित, आदिवासी, भटके-विमुक्त, शेतमजूर आदींचे अनेक प्रश्न आहेत. ते बाजूला ठेऊन खुशाल 'तुमचं हिंदुत्व खरं की आमचं खरं ' यावर अहमहमिका होत आहे. ही पुरोगामी म्हणविल्या जाणाऱ्या महाराष्ट्रासाठी अत्यंत लाजिरवाणी बाब म्हणावी लागेल.

**(लेखक प्रख्यात कवी, सामाजिक चळवळीचे अभ्यासक आहेत.)**



श्याम बसप्पा ठाणेदार


संपर्क क्र. : ९९२२५४६२९५

# अभिनय क्षेत्रातील भीष्माचार्य : दिलीपकुमार

आधुनिक केसरी

**ट्रॅजीडी किंग म्हणून ओळखले जाणारे हिंदी चित्रपट सृष्टीतील जेष्ठ अभिनेते दिलीप कुमार यांचा आज पहिला स्मृतिदिन. मागील वर्षी आजच्याच दिवशी म्हणजे ७ जुलै २०२१ रोजी दिलीपकुमार यांचे वृद्धपकाळाने वयाच्या ९८ व्या वर्षी दुःखद निधन झाले. दिलीपकुमार यंच्या निधनाने चित्रपट सृष्टीतच नव्हे तर संपूर्ण देशात शोककळा पसरली होती. दिलीपकुमार यांच्या निधनाने अभिनयाचे चालते बोलते विद्यापीठच हरपले असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.**

दिलीपकुमार यांचा जन्म ११ डिसेंबर १९२२ रोजी पेशावर येथे झाला. त्यांचे मूळ नाव मोहम्मद युसूफ खान असे होते. पेशावरहून त्यांचे कुटुंब उदरनिर्वाहासाठी मुंबईत आले. दिलीपकुमार यांच्यासह बारा भावंडे होते. त्यांच्या कुटुंबात पाहुण्यांचाही राबता होता त्यामुळे आपणही काही तरी काम करून घर खर्चास मदत करावी असा विचार करून दिलीपकुमार पुण्याला आले. तिथे त्यांनी लष्करी कँटीनमध्ये मॅनेजरचा सहाय्यक म्हणून काम केले. दुसऱ्या महायुद्धात लष्करी कँटीनचे व्यवस्थापन बदलले आणि दिलीपकुमार जमा केलेले पाच हजार रुपये घेऊन घरी परत आले. मुंबईला आल्यावर त्यांना पुन्हा नोकरी शोधावी लागली. दिलीपकुमार हे नोकरीच्या शोधात आहे हे त्यांचे परिचित डॉ मसानी यांना समजले तेंव्हा डॉ मसानी यांनी त्यांना माहीम येथील बॉम्बे टॉकीजच्या स्टुडिओमध्ये देविका राणी यांच्याकडे घेऊन गेले. देविका राणी यांनी दिलीपकुमार यांचे राजबिंडे व्यक्तिमत्त्व आणि उर्दूवरील पकड पाहून त्यांना महिना बाराशे रुपये पगारावर अभिनय करण्याची ऑफर दिली. वास्तविक हा प्रस्ताव दिलीपकुमार यांना मान्य नव्हता कारण चित्रपटात अभिनय करावा असा विचार त्यांनी कधीही केला नव्हता पण महिना बाराशे रुपये मिळतात ही रक्कम त्याकाळी खूप मोठी होती त्यामुळे त्यांनी हा प्रस्ताव स्वीकारला आणि देशाला एक महान अभिनय सम्राट मिळाला. देविका राणी यांनीच त्यांना दिलीपकुमार हे नाव दिले. १९४४ साली आलेल्या ज्वार भाटा या चित्रपटाद्वारे दिलीपकुमार यांनी आपल्या चित्रपट कारकिर्दीला सुरवात केली. १९४४ ते १९९८ पर्यंत म्हणजे सहा दशकापेक्षा अधिक काळ दिलीपकुमार यांनी आपल्या अभिनयाने गाजवून सोडला. या दरम्यान त्यांचे अनेक चित्रपट सुपरहिट झाले. यात त्यांनी वेगवेगळ्या प्रकारच्या भूमिका केल्या. अंदाज, राम और श्याम, आन, देवदास, आझाद, मुगल - ए - आझम, गंगा जमुना, नया दौर हे त्यांचे चित्रपट तर सुपरहिट झाले. या चित्रपटांनी तरुणाईला वेड लावले. १९५७ साली आलेल्या गंगा जमुना या चित्रपटातील मांग के साथ तुम्हारा... मैने मांग लिया संसार....या गाण्याने तरुणाईला वेड लावले होते. या चित्रपटात वैजयंती माला या त्यांच्या नायिका होत्या. चित्रपट रसिक त्यांच्या अभिनयाने इतके भारावले होते की त्याकाळच्या तरुणांचे ते आयडॉल बनले. देवदास या चित्रपटातील त्यांची भूमिका ही तर त्यांच्या कारकिर्दीतील मैलाचा दगड ठरली. त्यांच्या या चित्रपटातील भूमिकेचे नंतर अनेक अभिनेत्यांनी अनुकरण केले पण कोणालाही त्यांच्या अभिनयाच्या जवळपास पोहचता आले नाही. १९७६ साली आलेला बैराग हा चित्रपट त्यांचा नायक म्हणून शेवटचा चित्रपट ठरला या चित्रपटात त्यांनी तिहेरी भुमीका साकारली. त्यानंतर काहीकाळ ब्रेक घेऊन त्यांनी मनोज कुमार यांच्या क्रांती या चित्रपटापासून चरित्र अभिनेता म्हणून काम करण्यास सुरुवात केली. शक्ती, विधाता, मजदूर, दुनिया, मशाल, कर्मा या चित्रपटात त्यांनी चरित्र भूमिका केल्या. सुभाष घई यांच्या सौदागर या चित्रपटात राजकुमार यांच्यासोबत त्यांची जुगलबंदी चांगलीच गाजली. १९९८ साली आलेला किला हा त्यांनी अभिनय केलेला शेवटचा चित्रपट ठरला. या दरम्यान त्यांना अनेक पुरस्कारही मिळाले. सर्वोत्कृष्ट अभिनयासाठी दिलीपकुमार यांना आठ पुरस्कार मिळाले. त्यांना तीन वेळा राष्ट्रीय पुरस्काराने देखील गौरविण्यात आले. भारत सरकारनेही त्यांच्या अभिनय कारकिर्दीची योग्य दखल घेऊन पद्मभूषण, पद्मविभूषण या मानाच्या पुरस्काराने त्यांना गौरवले. हिंदी चित्रपट सृष्टीतील सर्वोच्च असा दादासाहेब फाळके पुरस्कारानेही त्यांना गौरविण्यात आले. पाकिस्ताननेही त्यांना निशान - ए - इम्तियाज या त्यांच्या सर्वोच्च पुरस्काराने गौरवले आहे. दिलीपकुमार हे अभिनयातील भीष्माचार्यच होते. त्यांचा सारखा अभिनेता पुन्हा होणार नाही. अभिनय सम्राट दिलीपकुमार यांना प्रथम स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!



हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -32, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद 431 005 (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. 205, 13 वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - 2, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
TITLE CODE -MAHMAR51117, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +91 90757 16739

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
TITLE CODE -MAHMAR51117, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# !! पंढरीचा पांडुरंग !!



सुधीर कोर्टीकर,
संपर्क क्र. 9765553312

आधुनिक केसरी

**आषाढी एकादशी, कार्तिकी एकादशी जसजशी जवळ येऊ लागते तस तसे वारकरी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून एकांतरीत प्रेरणेने भक्ती भावाने प्रेरित होऊन पंढरपूरच्या दिशेने चालू लागतात. वर्षानुवर्षे नव्हे तर पिढ्यानपिढ्या पंढरपूरची वारी करणारे भक्तगण आपल्या परिचयाचे आहेत. हजारो पालख्या या पंढरपूरच्या दिशेने वाटचाल करीत येऊ लागतात .त्या पालख्यांच्या बरोबर दिंड्या.. पताका ..टाळ ..मृदुंगाच्या बरोबर मनामनातील विठ्ठल भक्तीत लीन झालेले विठ्ठलाच्या ओढीने हे भक्तगण महिन्यात महिना चालत पंढरपुरी येऊन दाखल होतात.**

पंढरीच्या पांडुरंगाचा भक्तीचा महिमा अंगाध आहे. पांडुरंगाच्या या देवतेचा इतिहास खूप प्राचीन आहे. पंढरीमहात्म्य आपल्या बऱ्याच पुराणांमधून पंढरपूरला पांडुरंगपुर, पंडरीपुर, पांडुरंगपल्ली, पंडपरुर अशा अनेक नावांनी संबोधलेले आहे. पंढरपुरातील हे पांडुरंग मंदिर कन्नड राजा होयसळ विष्णूवर्धन यांनी स्थापन केल्याचा उल्लेख विविध ग्रंथातून आढळतो. म्हैसूर शासन दरबारातील ताम्रपटात राष्ट्रकुटातील राजा अधिनय यांनी एका जयद्वीप ब्राह्मणास "पांडुरंगपल्ली " हे गाव बक्षीस म्हणून दिल्याचा उल्लेख आढळतो. जैनराजा जयत्पाळ यांनी पंढरपूरला आल्यावर त्यांनी विठ्ठलाची ही मूर्ती पाहिल्यावर ही जैन देवतेची मूर्ती आहे. म्हणून काही काळ जैन देवतेप्रमाणे विठ्ठलाची पूजा-अर्चा केली याचाही उल्लेख आपणास आढळतो. मात्र पुढे जैनराजा होरसळ यांनी शृंगेरीच्या अधिपती रामार्जुनाकडून दीक्षा घेऊन त्यांनीच बाराव्या शतकात विठ्ठलाचे मंदिर बांधल्याचा उल्लेखही आपणास आढळतो. पंढरपुराच्या मंदिरातील शिलालेखा नुसार महाराष्ट्र तेलगू आणि कन्नड लोकांनी ज्या देणग्या मंदिरास दिल्या त्यांच्या नावाचा उल्लेख देखील आपणास पहावयास मिळतो. शके ११८४ आषाढ शुद्ध १४ वार बुधवार सन १२६२ रोजी पांडुरंगाच्या नव्या मूर्तीची प्रतिष्ठापना झाल्याचा उल्लेख ग्रंथांमधून आढळतो.राजा छत्रपती शिवाजीच्या काळात अफजलखानाच्या फौजाने मंदिरावर आक्रमण केलेले होते. त्यावेळी विठ्ठलाची मूर्ती सोलापूर जिल्ह्यातील माढा या गावी काही काळ ही मूर्ती हलविण्याची नोंद राजवाडे यांच्या इतिहासात आढळते. औरंगजेबाने पंढरपूर मंदिरावर हल्ला चढल्यावर विजयनगरचे राजे कृष्णदेवराय यांनी ही मूर्ती विजय नगरात हलवून त्यासाठी मंदिरही स्थापन केल्याची नोंद आपणास आढळते.

त्यानंतर मात्र विजापूराच्या दरबारी मंदिराची सर्व व्यवस्था करण्यासाठी शासनाकडून मंदिरातील पूजा..अर्चा..नैवेद्य..आणि इतर खर्चासाठी वार्षिक तीन हजार पाचशे रुपये देण्याची प्रथा सुरू झाली. पेशवेशाहीतही मंदिरास मोठा निधी उपलब्ध करून दिला गेला. सुरुवातीला विठ्ठल मंदिरात हरिजनांना प्रवेश नव्हता मात्र सानेगुरुजींच्या अथप्रयत्नांमधून विठ्ठल मंदिर दलितांसाठी खुले केले गेले. आज तर विठ्ठल मंदिरात अन्य जातींच्या महिलांची पुजारी म्हणून निवड करण्यात आलेली आहे. त्यामुळे वर्षाने वर्षे बडवे आणि उत्पातांचे विठ्ठलाचे पौरोहित करण्याचा जो मान होता तो लोपला .आज अन्य जाती जमातीच्या आणि तेही महिलांच्या हाती विठ्ठल रुक्मिणीची ही सर्व नित्य नियमाची पूजा अर्चा नैवेद्य करणाचा मान त्यांच्याकडे देण्यात आला.

आषाढी एकादशी, कार्तिकी एकादशी जसजशी जवळ येऊ लागते तस तसे वारकरी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून एकांतरीत प्रेरणेने भक्ती भावाने प्रेरित होऊन पंढरपूरच्या दिशेने चालू लागतात. वर्षानुवर्षे नव्हे तर पिढ्यानपिढ्या पंढरपूरची वारी करणारे भक्तगण आपल्या परिचयाचे आहेत. हजारो पालख्या या पंढरपूरच्या दिशेने वाटचाल करीत येऊ लागतात .त्या पालख्यांच्या बरोबर दिंड्या.. पताका ..टाळ ..मृदुंगाच्या बरोबर मनामनातील विठ्ठल भक्तीत लीन झालेले विठ्ठलाच्या ओढीने हे भक्तगण महिन्यात महिना चालत पंढरपुरी येऊन दाखल होतात.

पंढरपुरातील मुख्य सरळ रस्ता हा विठ्ठल मंदिराच्या पर्यंत आपणास घेऊन येतो. दुरूनच विठ्ठल रुक्मिणीचे मंदिराची ती शिखर आपणास दिसतात आणि मन प्रसन्न होऊन जातं. आपण जर चंद्रभागा नदीच्या दिशेने घाटाच्या पायऱ्या चढून आला तर मंदिराच्या मुख्य प्रवेशद्वाराकडे म्हणजेच पूर्व दिशेने महाद्वारात येतात. रेल्वे मार्गाने अथवा एसटी बसने जेव्हा आपण येता तेव्हा सरळ रस्त्याने विठ्ठल मंदिराच्या पश्चिम द्वाराकडे येता. पश्चिम द्वाराकडून अर्ध प्रदक्षिणा पूर्ण करत आपणास मुख्य द्वाराकडे यावे लागते. विठ्ठल मंदिरास एकूण आठ प्रवेशद्वारे आहेत. पूर्व दिशेस तीन. पश्चिम दिशेस एक .दक्षिण दिशेस एक .उत्तर दिशेस तीन अशी महाद्वारे आहेत .या महाद्वाराजवळ भक्तांना सुलभ दर्शन घेता यावं म्हणून मोठी भव्य दर्शन इमारत उभी केलेली आहे. स्त्रियांना.. छोट्या मुलांना..वृद्ध व अपंगांना रांगेत तासंतास उभे राहून त्रास होऊ नये म्हणून बसण्याची रांगेमध्ये केलेली आहे.



पांडुरंगाचे हे मंदिर पूर्वाभिमुख आहे मंदिराची लांबी ३५० फूट तर रुंदी १७० फूट आहे .मंदिराच्या भोवताली काळ्या दगडामधील मोठ्या भिंती बांधून मंदिरास भक्कम संरक्षण दिलेले आहे . आपण मंदिराच्या महाद्वारातून साधारण दहा-बारा पायऱ्या चढून आत येतो तेव्हा प्रथम दर्शन घडते ते संत नामदेवाच्या पायरीचे. संत नामदेवांनी या ठिकाणी समाधी घेतली म्हणून त्यांना या ठिकाणी विशेष स्थान दिलेले आहे. त्यांच्या पायरीस पितळाच्या धातूच्या पत्राने मडविण्यात आलेले आहे. संत नामदेवाचा सुंदर पितळी मुखवटा देखील डाव्या बाजूस ठेवण्यात आलेला आहे. मंदिरात प्रवेश होणारा प्रत्येक भक्त त्या पायरीस आपला पाय लागणार नाही याची काळजी घेऊन आत येतो. संत नामदेवाच्या त्या पायरील ला स्पर्श करून मनोभावे दर्शन करूनच प्रत्येक भक्त आज प्रवेश करतो. या नामदेव पायरीच्या वरील बाजूस पितळी पत्र्यावर चौदा व्यक्तींच्या आकृती रेखाटलेल्या आहेत या १४ व्यक्ती संत नामदेवाचे जवळचे नातेवाईक होते. संत नामदेवांनी समाधी घेतल्यानंतर त्यांचा वियोग सहन झाल्यामुळे या चौदा जणांनी चंद्रभागा नदीत आत्मसमर्पण केले. त्यांची आठवण म्हणून त्यांनीही या विठ्ठल दरबारी या जागी स्थान देण्यात आलेले आहे. नामदेवांच्या या पवित्र पायरीमुळे या महाद्वारा नामदेव दरवाजा असे संबोधलेले आहे. संत नामदेवाप्रमाणेच विठ्ठल भक्तीत ज्याने आपला देह समर्पित केला अशा " संत चोखामेळा " यांच्या अस्थीचे विसर्जन याच महाद्वाराच्या समोरच केलेले आहे .त्या ठिकाणी एका कुंडात मध्ये एक दगड उभा करून त्यावर एक छत्रीही उभी केलेली दिसते.

आपण महाद्वारातून आत आल्यावर आपणास देवघर दृष्टीस पडते. त्यानंतर आपण मुख्य मंडपात येतो. पुढे आल्यावर आपणास गणेशाचे दर्शन होतं. मुख्य मंडपातच देवाच्या नगारखान्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे. मुख्य मंडपातून पुढे आल्यानंतर आपण लाकडी स्वरूपातील मंडपात येतो. याच लाकडी मंडपात दोन मोठ्या दीपमाळा भक्तांच्या स्वागतासाठी उभ्या आहेत. भक्तांना उतरण्यासाठी त्या काळात बांधलेल्या ओवऱ्या देखील आहेत. महामंडपाच्या मधोमधच गरुडाचे व मारुतीच्या स्थान आहे. बाजूला देवासाठी रोज केल्या जाणाऱ्या महानैवेद्याची पाकशाळा आहे. आपण महामंडपातून पुढे तीन दरवाजे असलेल्या सभामंडपात प्रवेश करतो. त्याच्या बाजूलाच देवांचे दाग- दागिने ठेवण्याची खोली आहे. यापुढे आल्यानंतर १६ खांबी मंडपात आपण येतो. याच मंडपात सोन्या-चांदीने मडविलेल्या पत्र्याचा "गरुडखांब " आहे बाजूलाच संगमरवरी गोलाकार स्वरूपातील रंग शिळा आहे. विठ्ठल दर्शन घेऊन एका आत्मिक समाधानाने भाविक या १६ खांबी मंडपात येतात. आधी गरुडखांबास मिठी मारून दर्शन घेतात. नंतर गोलाकार रंगशिळेवर स्वतःचे दोन्ही कान पकडून विठ्ठलासमोर नाचत त्याचे तोंडाने नामस्मरण करताना दिसतात.

विठ्ठलाचे हे संपूर्ण मंदिर हेमाडपंथी स्वरूपातील बांधकामाचे आहे. सोळाखंबीच काय पण मंदिरातील प्रत्येक खांबावर देवतांच्या मूर्ती अतिशय सुंदर रीतीने तयार केलेल्या आपणास दिसतात .१६ खांबी मंडपातून आपणं पुढे येतो. पुढे चारखांबावर विराजमान असलेला विठ्ठल देवतेचा मुख्य मंडप लागतो. प्रत्येखांब सुंदरपणे घडविलेला आहे. आपण गर्भगृहात येतो.. नी आपल्या जीवनाचे सार्थक होऊन जातं. तासनतास रांगेत उभे राहून कित्येक मैलावरून आलेल्या भक्तांना त्या सावळ्या सुंदर मनोहररुपात विटेवर उभे असणाऱ्या सुकुमाराचे दर्शन होऊन जातं... त्यांचं जीवन कृतकरतार्थ झाल्याची अनुभूती त्यांना मिळते. सिंहासनावर उभी असणारी साडेतीन फूट उंचीची पांडुरंगाची ती अलौकिक मूर्ती दोन्ही हात कटेवर ठेवून उभी आहे. विठ्ठलाच्या मूर्तीस अत्यंत जवळून न्याहळले तर उजव्या हातात कमळाचे देठ आहे. नी तो हात उताणा स्वरूपात आहे . डाव्या हातात दक्षिणावर्त शंख धारण केलेला आहे .दोन्ही दंडावर सुरेख बाजुबंद आहेत. मनगटावर देखील मणीबंध बांधलेले आहेत. कमरेवर मेखला बांधीलेला आहे. गळ्यामध्ये कौस्तुभ मण्यांचा हार परिधान केलेला आहे. कपाळावर अलौकिक रत्नांचा टीका , तर कानात मकराकार कुंडलही धारण केलेली आहेत. गर्भगृहात सदैव ठेवणाऱ्या नंदादीपाच्या प्रकाशात हे सावळ्या सुंदर विठेरायाचे तेजोमय रूप पाहून साऱ्यांची अंतकरण भक्ती भावना भरून येतात. मग आपल्या परमदेवतेच्या दर्शनाने आलेला प्रत्येक जण तृप्त होऊन जातो.एका आत्मिक समाधानानी विठ्ठल मूर्ती हृदयात साठवूनच ते बाहेर पडतात.

विठ्ठलाच्या दर्शना नंतर भक्तांची पावले वळतात ती रुक्मिणी मंदिराकडे. महाद्वाराच्या बरोबर मागे दक्षिण द्वारा जवळ रुक्मिणीचं सुंदर मंदिर उभं आहे .रुक्मिणीचे मंदिरही हेमाडपंथी बांधकामाच्या स्वरूपात आहे. या मंदिरात दोन दरवाजे आहेत. हे मंदिर देखील पूर्वाभिमुख स्वरूपात आहे. सिंहासनावर करकटीवर असणारी ही रुक्मिणी देवीची मूर्ती काळ्या कुळकुळीत पाषाणातील अत्यंत रेखीव स्वरूपाची आहे . रुक्मिणीची ही मूर्ती अडीच फूट उंचीची आहे. नवरात्राच्या उत्सवात रुक्मिणीचे वस्त्रालंकार परिधान केलेले ते सर्वांग सुंदर रूप पाहून प्रत्येक भक्तगण भारावून जातो. नवरात्र उत्सवात प्रत्येक दिवशी वेगवेगळ्या वस्त्रालंकारांनी सोन्याच्या दाग दागिन्यांनी रुक्मिणी देवतेस सजविले जात असते.

आषाढी , कार्तिकी , चैत्री , माघी अशा चार वाऱ्यांच्या मोठ्या उत्साहात साजऱ्या केल्या जातात. तसेच विठ्ठले रुक्मिणी मंदिरात नवरात्र उत्सव.. दसरा उत्सव.. दिवाळी उत्सव ..पाडवा असे विविध उत्सव तितक्याच भक्तिभावाने साजरे करण्याची परंपरा आजही कायम आहे. नवरात्र महोत्सवात कथा कीर्तने प्रवचने यांच्या कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. नवरात्र उत्सवात रुक्मिणी स्वयंवराची कथाकथन केली जाते .पूर्वी पंढरपूरचे सुप्रसिद्ध साहित्यकार.. प्रवचनकार.. निरूपणकार.. वा.ना .उत्पात हे रुक्मिणी स्वयंवराची कीर्तने सुरेखपणे कथाकथनाद्वारे सांगत असत. असे कार्यक्रम ऐकून जमलेले सर्व भक्त गण अत्यंत तृप्त अंतकरणातून घरी परतताना दिसत असत.

पंढरपुरी येण्यासाठी आपण मिरज पंढरपूर या रेल्वेने पंढरपुरी येऊ शकता. एसटी बसेसने महाराष्ट्रातून प्रत्येक मोठ्या शहरातून पंढरपुरी आपण येऊ शकता. सोलापूरहून ७४ किलोमीटर अंतरावर पंढरपूर येथील क्षेत्र आहे पंढरपुरात निवासासाठी भोजनासाठी अनेक मठांमधून व्यवस्था केली जात आहे. अनेक हॉटेल्स मध्ये देखील अशी व्यवस्था केली जात आहे. त्याचबरोबर गजानन महाराज शेगाव यांनी मंदिराजवळ बांधलेले खूप मोठे भक्ती निवास देखील अल्प दरात उपलब्ध आहे .नव्याने बांधलेले मंगळवेढा रस्त्यावरील शासनाचे भक्तनिवास देखील अल्प दरात सुसज्ज असे सेवेमधून साऱ्या भक्तांसाठी उपलब्ध करून देण्यात आलेले आहे.

अशा या भुवैकुंठ असणाऱ्या पंढरपूर नगरात आपल्या परमप्रिय पांडुरंगाचे दर्शन घेण्यासाठी हजारो भक्तगण एका आत्मिक प्रेरणेनी पंढरपुरात येतात.. सावळ्या सुंदर रूप मनोहर असणाऱ्या त्यांच्या देवतेचे दर्शन ते घेतात. आपल्या घरा घरांकडे परतणारी त्यांची पावलं एक आत्मिक समाधानाने परततात..मनी हाच विचार असतो की माझ्या विठुरायाचे पुढे होईल...मग घरी परतून आपल्या कामात एकरुप होऊन जातात ते विठुरायाच्या भावपूर्ण भक्तीनं.. हे बाकी खर...

आधुनिक केसरी

# "हेची देही हेची डोळा"

भक्त पुंडलीकाला भेटायला पांडुरंग आले आणि आजही त्याने दिलेल्या विटेवरच उभे आहेत. तो आईवडिलांच्या सेवेत होता मी कुटीच्या बाहेर येईतोवर तुम्ही या विटेवर उभे रहा....!

नारदमुनींच्या सांगण्या वरुन त्या रात्रीच श्रीकृष्ण रुक्मिणींनी पुढल्याच दिवशी तातडीने द्वारकेला निघण्याचा निर्णय घेतला. तथापि निघण्यापूर्वी पंढरीच्या भक्तांचा निरोप घेण्यासाठी, श्रीकृष्ण प्रथम पुंडलिकाला भेटण्यास त्याच्या कुटीकडे आले. परंतु आदल्या रात्रीच्या पावसामुळे त्याच्या कुटीसमोर इतस्ततः चिखल पसरले असल्याने त्यांनी अंगणातूनच पुंडलिकास हाक दिली. साक्षात "विष्णुदेव" आपल्या दाराशी आलेले पाहून तो गहिवरला. आणि आदरभावे म्हणाला, "पांडुरंगा माझ्या आईवडिलांची मी प्रातर्विधी उरकत असल्याने कृपया तुम्ही कुटीत येऊ नका. मी थोड्याच वेळेत बाहेर येईन ".

श्रीविष्णुंच्या पायाला चिखल लागू नये म्हणून पुंडलिकानं आपल्या हाताजवळच असलेली एक विट उचलली आणि त्याला मनोभावे नमस्कार करून स्वतःच्या व आईवडिलांच्या माथी स्पर्श करून ती त्याने अंगणात टाकली. आणि पांडुरंगास विनंती केली की "मी बाहेर येईस्तोवर कृपया तुम्ही ह्या विटेवर उभे रहा."

श्रीकृष्णानेदेखील आपल्या भक्ताच्या विनंतीला मान देऊन आपले दोन्ही हात कटिवर ठेवून भोळसपणे त्या विटेवर उभे राहून त्याची वाट पाहु लागले. पुंडलिकाने भगवंताचे हे जिवंत स्वरूप आपल्या आईवडिलांना दाखवून साक्षात श्रीविष्णुंचे दुरुनच मनोभावे दर्शन घेण्यास सहाय्य केले.

श्रीकृष्णानेदेखील अगदी खुशीने हात उंचावून त्यांच्या नमस्कारास विनम्रतेने धन्यवाद दिले. आणि इथूनच नियतीच्या मनात पुढे काय घडवायच होते हे खुद्द "श्रीकृष्णास" सुध्दा कळले नाही.

एक घटका होत आला तरी पुंडलिक बाहेर आला नाही आणि इकडे गावातल्या लोकांमध्ये, त्याच्या अंगणात उभे असलेल्या चिंतातूर पांडुरंगाला बघुन शंकेची चर्चा सुरू झाली. थोड्याच वेळात त्याच्या कुटीसमोर भरपूर जनसमुदाय उभा झाला. तसेच श्रीकृष्णांना परतण्यास उशीर का होतोय हे बघायला "रखुमाई" देखील तिथे आली.

पांडुरंगाच्या हाकेला पुंडलिक बाहेर का येत नाही म्हणून एक सदगृहस्थ त्याच्या कुटीत जाऊन बघतात तर काय, पुंडलिकाचे आईवडील मरण पावलेत आणि त्यांच्या चरणी लीन होवून त्याने देखील स्वतःचे प्राण त्यागले आहे.

पांडुरंगाला ही बाब कळल्यावर त्यांनी तत्काळ आपल्या दिव्य दृष्टीने पुंडलिकाच्या मनातली गोष्ट जाणली आणि जनकल्याणाप्रती त्याची अपार विष्णुभक्ती पाहून उपस्थित जनसमुदाय समोरच त्यांनी त्याच्या आत्म्यास पाचारण केले. आणि म्हणाले, पुंडलिका मी तुझी ही अपार भक्ती जाणली असून तुझ्यावर मी अतिप्रसन्न झालो आहे. ह्या कलीयुगात मात्र कृतयुगातल्या भक्त प्रल्हाद पेक्षाही तुझी माझ्या प्रती असलेली भक्ती श्रेष्ठ मानली जाईल. त्यामुळे इथून पुढे माझ्या कोणत्याही पुजेत प्रथम तुझेच नाव आवर्जुन घेतले जाईल. पुंडलिका. तसेच जनकल्याणाप्रती असलेली तुझी आस्था पाहून मी अत्यंत प्रसन्न झालो असून आता जसा विटेवर उभा आहे त्याच स्थितीत पाषाणरुपात ह्याच पंढरीत पुढली २८ युगे माझ्या सर्व भक्तांना मी



अखंड दर्शन देत उभा राहीन.

भले ते गोरगरीब, मध्यम, श्रीमंत कुणीही तसेच कोणत्याही जातीचे, पंथाचे, धर्माचे असले तरीही जे कोणी माझ्या प्रती आस्था ठेवून स्वतःचे मातापिता, कुटुंब, गुरू, व्यवसाय, समाज व देशाप्रती असलेली आपली सर्व कर्तव्ये पार पाडत माझी भक्ती करतील मी त्यांच्या सर्व इच्छा पूर्ण करीन. येणाऱ्या सर्व संकटांपासून त्यांचे संरक्षण करीन. हेच वरदान दिले आज तुला."

असे म्हणून आहे त्याच ठिकाणी पाषाणमुर्तीत रुपांतर होवून "पांडुरंग" अंतर्धान पावले.

ही संपूर्ण घटना पाहिल्यावर थोड्याफार अंतरावर थांबलेल्या "रखुमाई" देखील आहे त्याच ठिकाणी पाषाणमुर्तीत रुपांतर होवून त्याही अंतर्धान पावल्या.

"हेची देही हेची डोळा" ह्या उक्ती नुसार तेथील उपस्थित जनसमुदाय, हा दैवी चमत्कार पाहुन थक्क झाले आणि एकमुखाने जल्लोषात म्हणाले,

"बोला पुंडलिका, वर दे हारी विठ्ठल !
रखुमाई पांडुरंगा, वर दे हारी विठ्ठल !!

आणि त्या दिवसापासून पंढरपुरात विराट अशा जनसमुदायाने "विठ्ठल आणि रखुमाई" च्या स्वयंभू मूर्तीच्या चरणाला स्पर्श करून माथा टेकून आशिर्वाद घेण्यासाठीची जी रिघ लागली ती अद्यापही अखंडित व अविरत चालू आहे हे विशेष.

अशा तऱ्हेने साक्षात वैकुंठवासी लक्ष्मी विष्णू नी, द्वारकानिवासी "श्रीकृष्ण रुक्मिणी"च्या रुपात आजही पृथ्वीतलावरच्या ह्या पुण्यनगरीत "पंढरपूर " इथे पाषाण स्वरुपात स्थितप्रज्ञ झालेला तो पवित्र दिवस म्हणजेच ही "आषाढी एकादशी ".

आणि म्हणूनच खास ह्या दिवशी कैक लाखांच्या संख्येने भारतातले सर्व वैष्णवभक्त पंढरपूरला जाऊन विठुनामाचा गजर करीत विठ्ठलाच्या चरणी माथा टेकवून आशिर्वाद घेण्यात धन्यता मानतात. आणि नक्कीच ह्या भक्तांच्या पदरी पांडुरंगाचे काही तरी दान व समाधान त्यांना मिळत असणार.

अन्यथा संत ज्ञानेश्वरांनी नऊशे वर्षापूर्वी काही दीडशेच्या संख्येने सुरू केलेल्या "वारी" ह्या प्रथेला
आज कैक लाख भाविकांची वर्णी लागली नसती हे आपल्याला आज मान्यच करावे लागेल. म्हणून बोला,
!! जय जय विठ्ठल, जय हरी विठ्ठल !!

# पाऊले चालती पंढरीची वाट...



दिलीप देशपांडे
मो.नं. ८९९९५६६९१७

आधुनिक केसरी

**"वारी"ही महाराष्ट्रातील एक धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरा आहे. पायी केल्या जाणाऱ्या पंढरीच्या वारीची परंपरा ही बरीच जुनी आहे. तेराव्या शतकात ही परंपरा असल्याचे उल्लेख सापडतात. ज्ञानदेवांच्या काळात त्यांच्या घराण्यात पंढरीच्या वारीची परंपरा होती. त्यांचे वडील वारीला जात होते, असा उल्लेख आढळतो. ज्ञानदेवांनी भागवत धर्माची पताका खांद्यावर घेऊन सर्व जातीपातीच्या समाजाला एकत्रितपणे या वारी सोहळ्यात सामील करून घेतले. संत एकनाथ महाराज, संत तुकाराम महाराज, यांनी सुद्धा वारीची परंपरा चालवली. ज्ञानदेवाच्या कर्तुत्वामुळे हा संप्रदाय प्रभावी ठरला.**

**जे विठ्ठलाचे भक्त असती, ते येवोनी एक होती गावोनी भगवत् भक्ती विठ्ठलाचे नाम घेत उत्तम मार्गी चालती....**

"वारी" म्हणजे महाराष्ट्रातील विविध गावांमधून निघून पंढरपूर येथे येणारी सामुदायिक विठ्ठल भक्तांची पदयात्रा. वारी ही महाराष्ट्रातील एक धार्मिक व सांस्कृतिक परंपरा आहे. ही वारी आषाढ आणि कार्तिक महिन्यातील शुद्ध एकादशी अशा दोन्ही वेळा होते.

**वारी म्हणजे विठ्ठलाचे भक्तीचा लळा...**
**वारी म्हणजे वैष्णव भक्तांचा मेळा...**
**वारी म्हणजे आनंदाचा सोहळा...**

आळंदी येथून संत ज्ञानेश्वर यांच्या पादुका आणि देहू येथून संत तुकाराम यांच्या पादुका पालखीत ठेवून ती पालखी रथातून पंढरपूर येथे मार्गस्थ होते.संत ज्ञानेश्वर, संत एकनाथ, संत तुकाराम हे वारकरी संप्रदायातील महत्त्वाचे संत होत.

शेतकरी मोठ्या प्रमाणावर असतात. कष्टकरी, महिला,असा सगळ्यांचा सहभाग वारीत असतो.गेल्या काही वर्षांपासून मोठ्या कंपन्यांचे अधिकारी, कर्मचारी, शालेय,महाविद्यालयीन विद्यार्थी,विद्यार्थिनी, निवृत्त जेष्ठ,यांचाही सहभाग दिसून येतो. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांचे मुलेही आता वारीत सहभागी होतात. वारकरी संप्रदायात लहान-मोठा,गरिब-श्रीमंत,पुरुष-महिला हा भेदाभेद नाही.

एकमेकांना माऊली म्हणून संबोधतात. नमस्कार करतात. तसेच नामजपाने पुण्य मिळते हा भाव आहे. एकादशी आणि इतर पवित्र दिवशी नित्यनेमाने पंढरपूरला जाणे म्हणजेच वारी होय. जो नियमित वारी करतो तो वारकरी. वारकरी जो धर्म पाळतात त्याला वारकरी धर्म असे म्हणतात. वारकरी धर्मालाच भागवत धर्म म्हटले जाते. पंढरी नगरीचा स्पर्श , चंद्रभागेत स्नान, आणि विठोबाचे,पांडुरंगाचे दर्शन या इच्छेपोटी वारकरी वारी चुकवत नाहीत, अशी भागवत संप्रदायाची धारणा आहे. त्यामुळेच आषाढीवारी ही प्रत्येक वारकरी महिलापुरुषांच्या मनात आदराचे आणि श्रद्धेचे स्थान बाळगून आहे असे मानले जाते.ती त्यांचेसाठी आनंदवारीच असते.त्यांचे मागणे एकच असते..
हेची दान देगा देवा...

**तुझा विसर न व्हावा ...तुझा विसर न व्हावा ...**

"वारी" करणाऱ्या व्यक्तीस "वारकरी" म्हणतात. भगवान विष्णूंचा अवतार असलेल्या पांडुरंगाचे/विठ्ठलाचे हे सारेच भक्त असतात. आपले कर्तव्यकर्म निष्ठेने करीत असताना ते भगवंताचे विस्मरण होऊ देऊ नये यासाठी गळ्यात तुळशीची माळ घालतात. ह्या माळेचा जपमाळ म्हणून उपयोगाशिवाय, ती गळ्यात घातल्याशिवाय वारकरी होता येत नाही असे वारकरी पंथ सांगतो.

सात्त्विक आहार, सदाचारण, करावे. परोपकार आणि परमार्थही करावा. जीवनातील बंधनातून, मोहातून हळूहळू बाजूस होऊन पांडुरंगाशी एकरूप व्हावे, नामस्मरण करावे,असा साधा आणि उघड परमार्थ वारकरी संप्रदायाने सांगितला आहे.

साधारणपणे पेरणीनंतर वारी सुरू होते,वारी परतून पर्यंत शेतात पिके वाढली असतात.पांडुरंगाचे दर्शनाने एक प्रकारची ऊर्जा मिळते. असा आनंद पुढील वारी पर्यंत वारकरी टिकवतो.

वारकरी धर्मात कोणत्याही कार्याची सुरुवात करताना "पुंडलिक वरदा हरी विठ्ठल श्री ज्ञानदेव तुकाराम" "पंढरीनाथ महाराज की जय!" असा जयघोष केला जातो. स्थानपरत्वे या जयघोषात "पंढरीनाथ भगवान की जय" असा वेगळे पणा आढळतो. अनेक ठिकाणी "माउली ज्ञानेश्वर महाराजकी जय" , "जगद्गुरु तुकाराम महाराजकी जय", "शान्तिब्रह्म एकनाथ महाराज की जय" अशी विविधता आढळते. या जयघोषाला वारकरी महावाक्य किंवा वारकरी महाघोष म्हटले जाते.

वारीत अभंग,ओव्या, भारुड,हरीपाठ,ज्ञानेश्वरी,हे सगळे येत.जो तो आपल्याच नादात असतो.

वारीसाठी भक्तांना वाहनांची सुविधा देण्यात येते. यासाठी शासकीय स्तरावर योजना राबविल्या जातात.. जादा बसेसही सोडण्यात येतात. मार्गाची पाहणी करणे, रस्त्यांची स्वछता, वैद्यकीय सेवा, पिण्याचे पाणी यांची व्यवस्था महाराष्ट्र शासनातर्फेकेली जाते.

पंढरपूरला जात असलेल्या वारक-यांची सेवा करण्याची संधी समाजाच्या विविध स्तरातून स्वेच्छेने घेतली जाते. काही मंडळी वैयक्तिक किंवा कौटुंबिक स्तरावर अशी सेवा पुरवितात. ज्यामध्ये वारीच्या मार्गावर उभे राहून वारक-यांना खाद्यपदार्थ पुरविणे, पाण्याची व्यवस्था, कपडे, रेनकोट देणे अशी सेवा केली जाते. सामाजिक संस्था, औद्योगिक संस्था या सुद्धा वारक-यांना विविध सुविधा पुरवितात. यामध्ये त्यांची सेवा करणे असा भाव असतो. काही वैद्यकीय संस्था आणि रुग्णालये वारकरी भक्तांच्या शारीरिक चाचणी, उपचार यांची काळजी घेतात.

महाराष्ट्राच्या काना-कोपऱ्यातून ठिकठिकाणाहून लाखो भाविक लोक विठ्ठल नामाचा गजर करीत आषाढी एकाद्शीला पायी चालत येतात.हिलाच आषाढी वारी म्हणतात. चंद्रभागेत स्नान करून विठ्ठलाचे दर्शन घेतात. आषाढीला या दिवशी शेगाव येथून श्री संत गजानन महाराजांची पालखी, आळंदीहून ज्ञानेश्वरांची, देहूहून तुकारामांची, त्रंबकेश्वरहून निवृत्तीनाथांची, पैठणहून एकनाथांची,मुक्ताईनगरहून संत मुक्ताबाईची पालखी पंढरपूरला येते.सोपानदेवांची पालखी सासवड येथून येते.

उत्तर भारतातून कबिराची पालखी येते. हजाराने दिंड्या पंढरपूरच्या वाटेने पांडुरंगाचा जयघोष करत मार्गस्थ असतात.

आषाढ महिन्यातील (जून-जुलै) शुक्ल/शुद्ध पक्षातील अकरावी तिथी ही प्रथमा एकादशी / महा एकादशी / देव-शयनी एकादशी म्हणून ओळखली जाते. हा मोठा पवित्र दिवस आहे. या दिवशी उपवास केला जातो. या दिवसापासून चातुर्मास (चार महिन्यांचा काळ) सुरू होतो, तो कार्तिकी एकादशीला संपतो. अशी मान्यता आहे की या दिवशी भगवान विष्णू हे, क्षीरसागरात शेषनागावर, योगनिद्रेस जातात आणि योगनिद्रेतून बाहेर येतात ते कार्तिकी एकादशीला (प्रबोधिनी एकादशी) या काळात मांसाहार वर्ज्य केला जातो.

ह्या काळात जमेल ते चातुर्मासात नियम करतात. (जप,पोथीवाचन,आदी)

पंढरपुराला उत्तरेकडे तीन व दक्षिण व पश्चिमेकडे प्रत्येकी एक द्वार आहे. महाद्वार पूर्वेकडे असून, ज्या अकरा पायऱ्या चढून गेल्यावर ते लागते



त्यांतील एका पायरीला 'नामदेवाची पायरी' म्हणतात. विठ्ठलाला तुळस आणि मंजिरीचा हार वाहतात.

तुळस श्रीलक्ष्मीचे प्रतीक आहे व श्रीलक्ष्मी ही श्रीविष्णूची पत्नी असल्यामुळे (श्री विठ्ठल हा श्रीविष्णूचे रूप आहे.) ती तुळशीच्या माध्यमातून श्रीहरी चरणी राहते.तर वारकरी स्वतः तुळशीच्या वाळलेल्या काड्या जाळून त्यात,कापूर, चांगले तुपा पासून बनवलेला बुक्का लावतो.ह्या बुक्क्याला फार महत्व आहे.बुक्का, तुळशीची माळ हे आवश्यक आहे.अर्थातच हे विठ्ठलाचे, पांडुरंगाचे भक्तिचे प्रतिकच आहे.

वारीच्या दरम्यान होणारे "रिंगण" हे वारीचे वैशिष्ट्य मानले जाते. कडूस फाटा,वेळापूर आणि वाखरी येथे रिंगण होते. रिंगण ही एक पवित्र आणि श्रद्ध्येय संकल्पना आहे. मोकळ्या मैदानात वारकरी परस्परांचे हात धरून गोलाकार उभे राहतात. यातील मोकळ्या जागेतून ज्ञानेश्वर महाराजांचा घोडा धावतो. याला आदराने "माऊलीचा अश्व" असे म्हणतात. या अश्वावर स्वतः ज्ञानेश्वर महाराज आरूढ होतात अशी वारकरी संप्रदायात धारणा आहे. "धावा" म्हणजे धावणे. असे मानले जाते की पंढरपूरला पायी जात असताना संत तुकाराम महाराज यांना वेळापूर येथील छोटयाशा टेकडीवरून विठ्ठलाच्या देवळाच्या कळसाचे दर्शन झाले आणि विठ्ठलाच्या दर्शन ओढीने ते तिथून पंढरपूरपर्यंत धावत गेले. याचे स्मरण म्हणून वारकरी वेळापूरपासून पंढरपूरपर्यंत शेवटचा टप्पा धावत जातात.

आषाढी एकादशीच्या पहाटे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री सपत्नीक श्री विठ्ठल आणि रुक्मिणीची महापूजा करतात. याला शासकीय पूजेचा दर्जा दिलेला आहे. त्यांच्या बरोबरच वारकरी समुदायातील एका दाम्पत्याला प्रतिवर्षी पूजेचा मान मिळतो. असा मान मिळणे वारकरी संप्रदायात आदराचे समजले जाते.

संत साहित्याचे अभ्यासक डॉक्टर रामचंद्र देखणे म्हणतात वारी हा भगवत भक्तीचा नुसता अविष्कार नसून भक्ती प्रेमाची अनुभूती घेण्याची ती सहज स्थिती आहे. परब्रम्हला साठवीत साठवीत विवेकाच्या दिशेने होणारी उन्मत्त वाटचाल म्हणजे पंढरीची वारी. मानवी जीवनात परिवर्तनाच्या दिशेने पडणारे विवेकी पाऊल म्हणजे वारी. बहुतेक क्रियांमध्ये साधन खडतर असते तर साध्य आनंद रूप असते. वारीच्या वाटचालीत साधन आणि साध्य दोन्ही आनंद रूपच. ज्ञानरूप परमात्मा हे साध्य तर भक्ती वाटचाल हे साधन आहे.

प्रत्येक भक्ताला, वारकऱ्याला आषाढी एकादशीला पांडुरंगाचे दर्शन होणारच.कारण तो प्रत्येकाचे मनामनात आहे.

गेल्या दोन वर्षात कोरोनामुळे वारीवर निर्बंध असल्यामुळे वारकरी वारी पासून वंचित राहिले परंतु आता वातावरणात बदल झाल्यामुळे खूप मोठ्या संख्येने वारकरी सहभागी झालेले आहेत...

आता वारकऱ्यांची पाऊले चालली आहे पंढरीच्या वाटेने.......
विठ्ठल.... विठ्ठल... जय हरी विठ्ठल.

# पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंसमोर संकटांची मालिकाच उभी

आधुनिक केसरी

**महाराष्ट्र राज्याचे राजकारण खऱ्या अर्थाने 12/13 तारखेला स्थिरावेल किंवा चित्र स्पष्ट होईल. हे चार दिवस म्हणजे 7/8/9 आणि 10 या तारखा स्थित्यंतराच्या आहेत. शिवसेनेच्या 18 खासदारांपैकी 14 खासदार एकनाथ शिंदेंसोबत येतील. जेमतेम चार खासदार कदाचित उद्धवजी सोबत राहतील. श्रीमती द्रौपदी मुर्मू यांना राष्ट्रपतीपदासाठी पाठिंबा द्यावा अशी मागणी राहुल शेवाळे यांनी पत्राद्वारे उद्धव ठाकरेंना केली आहे. परंतु उद्भवलेल्या परिस्थितीची वास्तविक जाण अजूनही न झालेले पक्षप्रमुख उद्धव ठाकरे अद्याप गोंधळलेलेच आहेत. ते वैचारिक दृष्ट्या ब्लॉक झाले आहेत. संजय राऊत अजूनही तोडफोडीतच अडकले आहेत. अजूनही फुटीर आमदार आमचे संपर्कात आहेत असे स्वप्रवत ते बरळत आहेत. 11 आणि 12 तारखेला सर्वोच्च न्यायालयात जेंव्हा सुनावणी चालू होईल, त्यावेळपर्यंत 14 खासदारही शिंदे गटात दाखल झालेले असतील.**

"शिवसेना धर्मवीर बाळासाहेब" या नावाने एकनाथ शिंदे हे आपला स्वतंत्र पक्ष स्थापन करतील आणि आमचीच शिवसेना खरी असल्याचा दावा करतील. एकदा का एकनाथ शिंदे गटच खरी शिवसेना आहे हे जाहीर झाले की ठाकरे परिवारातील उद्धव ठाकरे कुटूंब वगळता इतर ठाकरेही उद्धव ठाकरेंविरोधात वडिलोपार्जित प्रॉपर्टीवरून वाद उकरून काढतील आणि एकाच वेळी कमजोर उद्धव ठाकरेंना दोन्ही तिन्ही प्रकरणी भांडणे अवघड जाईल.

बाळासाहेबांनंतर उद्धव ठाकरेंना शिवसेनेचा वारस ठरवल्यानंतर उद्धवजींनी बाळासाहेबांच्या सर्वच प्रॉपर्टीज् वर हक्क प्रस्थापित करून ताब्यात घेतल्या आहेत. कोर्ट केसेस झालेल्या आहेत. आता एक संकट आले की सगळीकडून संकटांची मालिकाच उभी राहात असते आणि हतबल माणूस सुज्ञ आणि योग्य मार्गदर्शनाअभावी चुका करत राहतो आणि जास्तच अडकत जातो.

सध्या उद्धवजींसोबत असलेल्या 13 शिल्लक आमदारांपैकी अजून सात जण एकनाथ शिंदे गटात दाखल होतील. तसेच 18 पैकी 14 खासदारही एकनाथ शिंदे गटात सामील होतील. वेळीच उद्धवजींनी निर्णय घेऊन द्रौपदी मूर्मू यांना पाठिंबा जाहीर केला तर कदाचित काही दिवस म्हणजे राष्ट्रपतीपदाचे किंवा ऑगस्ट मधील उपराष्ट्रपतीपदाचे निवडणुकीपर्यंत खासदार मंडळी शांत राहतील पण फुटण्याची टांगती तलवार कायम उद्धवजींना छळत राहील. चंद्राबाबू नायडूंचे बंडखोरीचे उदाहरण सर्वोच्च नायालयासमोर आहेच. विधानसभा अध्यक्षपदाची निवडणूक आणि विश्वासदर्शक ठराव 164 मते घेवून जिंकून एकनाथ शिंदे गटाने 75 ते 80 टक्के लढाई जिंकलेलीच आहे. आता फक्त न्यायालयाचे शिक्कामोर्तब बाकी आहे. शरद पवार साहेब परिस्थितीचा अभ्यास करून अजून एखादा पेच निर्माण करण्याची शक्यता नाकारता येत नाही. परंतु देवेंद्र फडणवीस यांनी योग्य माहिती आणि योजना आखून अमितभाई शाह आणि जे.पी.नड्डा यांचे अनुभवाचे आणि नियोजनाचे मार्गदर्शनाखाली भाजप विरोधक प्रचंड घायाळ केले आहेत.

एकनाथ शिंदे यांच्या धीरगंभीर नेतृत्वाचा आणि अद्भुत विश्वासार्हतेचा चपखल वापर करून सर्वांनाच जखमी केले आहे. काय घडले, कसे घडले, कोणी घडवले, का घडले, याचे आकलन व्हायला साहेबांनाच वेळ लागत आहे तिथे इतरांचे काय घेता. सगळे विरोधक सावरे सावरे पर्यंत उद्धव ठाकरेंची शिवसेना नेस्तनाबूत झालेली असेल. आधीच प्रकृती चांगली नसलेले, अँजिओप्लास्टी एकापेक्षा जास्त वेळा झालेले, कमजोर, कोरोनाग्रस्त, स्पाँडिलायसिसने ही बेजार असलेले शिवसेना पक्षप्रमुख खरेच कातडे पांघरलेल्या खोट्या वाघासारखे झालेले आहेत.

नुसते तोंड चालवल्याने पक्ष चालतो असे होत नाही. पक्षप्रमुख म्हणून उद्धवजींचा धाक हा झाकली मुठ होती तिथपर्यंत ठिक होतं, पण घराण्याचे धोरण बदलून निवडणुकीचे राजकारणात तथा सत्तेच्या खेळात उडी घेतल्याने कमजोरी जगजाहीर झाली. शरद पवारांना ठाम नकार देऊन शिवसेनेचाच आमदार मुख्यमंत्री होणार, पण मी स्वतः नाही होणार,



जमत असेल तर हो म्हणा असा पावित्रा त्याच वेळेस घेतला असता तर इज्जत बंद मुठीसारखी अबाधित राहिली असती. परंतु बाईलबुध्दीचा सल्ला आणि हुरळ्या बाळराजेंची घाई नडली. मुख्यमंत्री होवून साहेबांचे हातचे बाहूले बनुन व गुळाचा गणपती होऊन हिंदू विरोधी निर्णय आणि हिंदू विरोधी बोलणे आणि अतिरेकी हिंदू हितविरोधी मदत यामुळे सख्खेच दुश्मन झाले. दहा संधी देऊनही संजय राऊत आणि बाळराजे आणि मोठे साहेब यांच्या नादी लागून आपलेच पितळ पार उघडे पाडले. पक्ष नेतृत्व आणि सत्ता, तसेच आमदारकी घालवून बसले. नशीब की ऐन याच काळात एक मुलूख मैदानी तोफ आजारपणामुळे शस्त्रक्रियेमुळे हॉस्पिटलाईज होती नाहीतर उद्धवजींचे काही खरे नव्हते.

भाजप भटा ब्राह्मणांचा पक्ष ही वदंता खोटी ठरवत गोपीनाथराव मुंडे यांनी सर्व थरात आणि जातीधर्मात पक्ष विस्तार केला. भाजपचा मतदार वर्ग सर्व थरात वाढवला. तरीही काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेसला कंटाळलेले मराठा, ओबीसी, इतर मागास, शिवसेनेकडे हक्काने वळले होते. ते नरेंद्र मोदींच्या अद्वितीय, नेत्रदीपक कामगिरीने भाजपकडे सरकत आहेत आणि स्थिरावतही आहेत. तरीही भारतीय राजकारण स्वार्थ, व्यवसाय, व्यापार, धंदा, भ्रष्टाचार या मार्गावर काँग्रेसने नेल्यामुळे अजून भाजपाचे राष्ट्र प्रथम, नमस्ते सदा वत्सले मातृभूमे ही विचारसरणी रुजायला वेळ लागेल. गेल्या आठ साडेआठ वर्षात पुष्कळ बदल झाले आहेत.

होत आहेत. मुख्य यश हे आहे मोदी सरकारचे की सर्वसामान्य जनता राजकारणात, समाजकारणात रस घेत आहे, जागृत होवून प्रत्येक बदल आत्मसात करत आहे. आपले हीत अहीत समजून घेऊन मत देत आहे. खरेखोटेपणा पडताळून पाहात आहे. परंपरागत चालत आलेले वाईट नेतृत्व झुगारून देशहिताला प्राधान्य देत आहे.

अकरा आणि बारा तारखेला सर्वोच्च न्यायालयाने एकदा ग्रीन सिग्नल दिला की एकनाथ शिंदे यांनी विश्वासदर्शक ठराव संमत झाल्यावर अभिनंदनाच्या भाषणांना उत्तर देताना जी आकर्षक शैली वापरून, विश्वासू शब्दांची अचूक निवड करत दादा बाबा म्हणत योग्य आदर देत जे चपखल टोमणे मारले, मनातील खदखद सौम्य तरीही प्रभावी भाषेत मांडली ते पाहता त्यांना हलक्यात घेणारे साहेबांसह सर्व विरोधक सपशेल तोंडावर आपटले आहेत. अशा पोहोचलेल्या नेत्यासोबत काम करताना देवेंद्र फडणवीस आणि भाजपच्या स्थानिक नेत्यांचा कस लागणार आहे. एकनाथ शिंदे सहजासहजी सत्तेसाठी तडजोडी करणारे नाहीत. खरोखरंच बाळासाहेबांचे हिंदूत्व पायदळी तुडायला निघालेल्या उद्धवजींविरोधात तत्वासाठीच बंड केले ती तत्वे जिवापाड जपणार हेही त्यांनी अधोरेखित केले आहे. त्यांच्या भाषणाने तमाम महाराष्ट्र प्रभावित झाला असून "बंदे मे है दम" म्हणत आहे. 2024 मध्ये भाजपचा कस लागणार आहे. केंद्रीय नेतृत्वाची योजना आणि देवेंद्र फडणवीस यांच्यावरील जबाबदारी याची आता परीक्षा सुरू झाली आहे.

**पीपीएम पुणे**

# अंबाजोगाईतील धाकट्या देवघरा संबंधित देवस्थान जमिनीतील बेकायदेशीर फेरफार तात्काळ रद्द करण्याचे आदेश तरीही अद्याप काहीच कारवाई नाही

आधुनिक केसरी न्यूज

**सुनिल सिरसाट**

**अंबाजोगाई :** येथील देवस्थान संबंधित धाकटे देवघर दत्तात्रय संस्थान मधील अर्थक (अर्चक) यशवंत सर्वज्ञ गोस्वामी यांना देवाची दिवा-बत्ती, पुजा-आर्चा, उत्सव-निगरानी आणि ईतर देवा संबंधित देखभालीसाठी आणि स्वत:सह कुटुंबाची उपजीविका भागवण्याकरिता ईनामी धोरणाने २३ हे. ३१ आर. जमीन शासन धोरणानुसार बहाल केली होती.

परंतु कालांतराने या जमिनीची बेकायदेशीररित्या विक्री केल्याने त्या विरुद्ध अंबाजोगाई येथील शासन पुरस्कृत (अनेक शासकीय कार्यालयांनी उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित असणारे) सामाजिक कार्यकर्ते विलासराव जोगदंड यांनी महसूल प्रशासनात सर्वच स्तरावर कारवाई केल्याने प्रकरण उघडकीस आले.

**संबंधित जमिनीचे फेरफार तात्काळ रद्द करून ती जमीन परत देवस्थानाच्या नावे करुन दोषींवर तात्काळ कडक कारवाई करावी : विलासराव जोगदंड**

संबंधित प्रकरणाच्या मुळाशी जाऊन जोगदंड यांनी संबंधित जमीनीचे फेरफार तात्काळ रद्द करण्यात येऊन संबंधित




प्रकरणातील दोषींवर कठोर कारवाईचीही मागणी केली असल्याचे खुद्द जोगदंड यांनी दै.आधुनिक केसरीशी बोलताना सांगितले.

**जुने-नवे फेरफार रद्द करण्याचे तहसीलदारांना उपजिल्हाधिका-यांचे ६ महिन्यांपुर्वी आदेश**

जुने-नवे फेरफार रद्द करण्यात यावेत आणि तात्काळ संबंधित जमीन देवस्थानाला परत बहाल करावी असा आदेश उपजिल्हाधिकारी शरद झाडके यांनी अंबाजोगाई तहसिलदार बिपीन पाटील यांना दिले असून संबंधित आदेशाला आता ६ महिन्यांच्या वर कालावधी उलटून गेला आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवरती कठोर कारवाई करण्यासाठी तात्काळ वरिष्ठांना प्रस्ताव-अहवाल पाठवण्याचेही स्पष्टपणे सांगितले आहे. तरीही अद्याप पर्यंत काय कारवाई केली कळायला मार्ग नाही. संबंधित फेरांमधे केवळ फेरफार क्र. 24157 नुसार वारस व विरासत पुरते मर्यादित राहून बाकी जुने 2 तर नवीन 6 फेरफार तात्काळ रद्द करण्यात यावेत अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते विलासजी जोगदंड यांनी लावून धरल्याने अखेर हे सर्व बेकायदेशीर फेरफार रद्द करण्यात आले. मात्र पुढील अपेक्षित कार्यवाही अद्यापही करण्यात आलेली नाही. यावरून काय समजायचे.....??

**देव जगाचा मालक : तेंव्हा देवाचा मालक होण्याचा कुणाला अधिकार नाही : विलास जोगदंड**

सृष्टीची निर्मितीच देवाने केली अशी आख्यायिका आहे. मग जर का देव जगाचा मालक आहे, तर हा प्रकार म्हणजे देवाचा मालक होण्याचा असल्याची खंत सामाजिक कार्यकर्ते तथा आर.टी.आय कार्यकर्ते विलास जोगदंड यांनी व्यक्त केली.



देवाची सेवा करणाऱ्या पुजाऱ्यांनी जर देवाची जमीन हडपण्याचा वा अधिकार नसताना बेकायदेशीररित्या विकण्याचा प्रयत्न केलातर आता नेमका कोणावर... किती विश्वास ठेवायचा हाही प्रश्न या अनुषंगाने उभा राहतो. असाच काहीसा प्रकार मुस्लिम धर्मातील ईनामी जमिनी संबंधित तर ख्रिश्चन धर्माच्याही बाबतीत शहरात दिसून येत असल्याने लवकरच त्याही प्रकरणांमध्ये अशाच पद्धतीने छडा लावून त्याही धर्मियांना संबंधित देवस्थानच्या जमिनी परत बहाल केल्याशिवाय स्वस्त बसणार नसल्याचा ईशारा विलासरावजी जोगदंड यांनी दै.आधुनिक केसरी च्या माध्यमातून दिला असून या अशा ठक भाविक-भक्तांना तथा अर्चकांना आणि लांडीलबाडी करून कमी पैशात देवाच्या जमिनी खरेदी तथा हडप करणाऱ्या भू-माफियांना लवकरच तुरुंगात पाठवल्या शिवाय स्वस्त बसणार नसल्याचेही जोगदंड यांनी आमच्या माध्यमातून गर्भीत ईशारा दिला असून यानिमित्ताने संपूर्ण बीड जिल्ह्याला हादरवून सोडले आहे.........!!.



# मोलखेडा येथे स्मशानभुमीत वृक्ष लागवड

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील मोलखेडा येथे दि.५ रोजी स्मशानभूमीत वृक्ष लागवड करण्यात आली. मोलखेडा येथील सरपंच मनिषा ज्ञानेश्वर वारंगणे यांनी पुढाकार घेऊन व ग्रामपंचायतच्या वतीने संपूर्ण स्मशानभूमी अगोदर साफसफाई करून ज्ञानेश्वर रामदास वारंगणे व ग्रामविकास अधिकारी सुरेखा पवार यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

ग्रामपंचायत यांच्या माध्यमातून गावातील स्मशानभूमीत वृक्ष लागवड मोठ्या प्रमाणात करण्यात आली. सोयगाव तालुक्यातील मोलखेडा ग्रामपंचायत यांच्या माध्यमातून गावातील रस्त्यालगत व सार्वजनिक ठिकाणी वृक्षारोपण करण्यात आले. जंगलतोड व अन्य कारणांमुळे झाडांची संख्या कमी होत आहे. त्यामुळे अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. याबाबत शासनाकडून प्रबोधनात्मक कार्यक्रम राबवून जनजागृती केली जात आहे. ग्रामसेवक सुरेखा पवार मँडम व सरपंच मनिषाताई वारंगणे यांच्या माध्यमातून मोलखेडा गावातल्या स्मशानभूमीत जमिनीवर विविध प्रकारचे झाडाच्या कलमांचे वृक्षारोपण करून व सामाजिक बांलिकी जोपासून पर्यावरण संकल्प केला आहे. अशा प्रकारे वृक्षारोपणाचा उपक्रम राबविण्यात आला.

या कार्यक्रमावेळी मोलखेडा उपसरपंच गुलाबसिंग राणा, रामभाऊ रामचंद्र वारंगणे, विठ्ठल पाटील, भागवत इंगळे, सुनील पाटील, अतुल इंगळे, कैलास शेळके, तंटामुक्ती अध्यक्ष अभिमान पाटील, अमोल शेळके, शालेय समितीचे अध्यक्ष राजू सुपडा वारंगणे, इरफान शेख, डिंगाबर पाटील, भूषण पवार, वैभव गायकवाड, भिमराव लोंढे, सिद्धार्थ जाधव, शिपाई विजय पावलं, रामलाल झाबंरे व इतर ग्रामपंचायत सदस्य वृक्ष लागवड करतेवेळी ग्रामपंचायत सदस्य उपस्थित होते.

# महा मेट्रोला प्रतिष्ठित आशिया, इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स प्राप्त

## वर्धा रोड डबल डेकर उड्डाणपूल, मेट्रो स्थानके रेकॉर्ड बुकमध्ये

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** महा मेट्रो नागपूरच्या शिरपेचात आणखी एक मानांचा तुरा रौवला गेला असून २ महत्वाच्या प्रकल्पांना अतिशय प्रतिष्ठेचे अश्या आशिया आणि इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्सचा सन्मान प्राप्त झाला आहे. महा मेट्रोच्या २ प्रकल्पांना अश्या प्रकारे रेकॉर्ड करता निवड होणे हे महा मेट्रोच्या उत्कृष्ट कामाचे पारितोषिक आहे. महा मेट्रोला या आधी अनेक महत्वाचे पुरस्कार आणि सन्मान प्राप्त झाले असून हा रेकॉर्ड म्हणजे एक मैलाचा दगड आहे.

रेकॉर्डसाठी दोन प्रकल्पाची निवड झाली असून रेकॉर्ड करिता नामांकित करण्यात आलेले २ प्रकल्प खालीलप्रमाणे आहेत :

**वर्धा मार्गावरील विद्यमान महामार्गावर हायवे फ्लाय-ओव्हरसह सर्वात लांब व्हायाडक्ट :** मेट्रो रेल सिंगल कॉलम पिअर्सवर हायवे फ्लायओव्हर आणि त्याच ठिकाणी मेट्रो रेल्वे मुख्य म्हणजे सुरवातीला या कार्याकरिता स्वतंत्र पिअर तयार करण्यात होते, नंतर याचा आढावा घेत डबल डेकर व्हायाडक्ट तयार करण्यासाठी महामार्ग उड्डाणपूल आणि मेट्रो रेल एकत्रित करण्याचा निर्णय घेण्यात आला. डबल डेकर व्हायाडक्ट पहिल्या स्तरावर महामार्ग उड्डाणपूल आणि दुसऱ्या स्तरावर मेट्रो रेल्वेचे संचालन ज्यामुळे जमिनी मार्गावर विद्यमान महामार्गासह तीन स्तरीय वाहतूक व्यवस्था निर्माण झाली आहे. मुख्य म्हणजे याकरिता अतिरिक्त भूसंपादन करण्याची गरज पडली नाही. ज्यामुळे जमिनीची किंमत आणि बांधकामाचा वेळ तसेच प्रकल्पाचा खर्च कमी झाला.

**डबल डेकर व्हायाडक्टवर निर्माण करण्यात आले सर्वात जास्त मेट्रो स्टेशन :** वर्धा रोडवरील 3.14 किमी लांबीच्या डबल डेकर व्हायाडक्टमध्ये छत्रपती नगर, जय प्रकाश नगर आणि उज्वल नगर अशी तीन मेट्रो स्टेशन आहेत. या स्थानकांना विशेष नियोजनाची आवश्यकता असते ज्यामध्ये मेट्रोच्या कार्यात्मक संचालन पूर्तता करण्यासाठी विशिष्ट् स्थानकाच्या विशिष्ट् मर्यादा तसेच डबल डेकर व्हायाडक्ट चे निर्माण कार्य या स्थानकांची अभियांत्रिकी विचार-प्रक्रिया, संकल्पना, डिझाइन आणि अंमलबजावणी हे आव्हानापेक्षा कमी नव्हते.

महत्वाचे म्हणजे इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स तर्फे सन्मान प्राप्त होण्याची हि पहिली वेळ नसून या आधी मार्च २०१७ मध्ये `सेफ्टी ऐट वर्क' (कार्यस्थळी सुरक्षा) या विषयावर सर्वात मोठी मानव शृंखला बनवण्याबद्दल अश्याच प्रकारे नोंद झाली होती. त्या मानव शृंखलेत महा मेट्रोचे अधिकारी, कर्मचारी, कामगार आणि इतर मोठ्या प्रमाणात सहभागी झाले होते. प्रकल्पाचे काम सुरू झाल्यापासून महा मेट्रोला अनेक पुरस्कार आणि सन्मान प्राप्त झाले आहेत.

अश्या प्रकारे मेट्रोच्या दोन प्रकल्पांची आशिया आणि इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स सारख्या प्रतिष्ठित सन्मानाकरता निवड होणे अतिशय महत्वाचे आहे. या सारखे आणखी काही नवीन रेकॉर्ड महा मेट्रो तर्फे स्थापित होतील हा विश्वास आहे. महा मेट्रो अतिशय उत्कृष्ट प्रकारे प्रकल्पाचे नियोजन, संचालन आणि त्याची अंमलबजावणी करीत असल्याचे द्योतक आहे.



# धुळ्यात स्व.रामविलास पासवान यांची जयंती साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** दलित, शोषित, पिडीतांचे कैवारी लोक जनशक्ति पार्टी चे संस्थापक पद्मभूषण पुरस्काराने सम्मानित भारत सरकारचे माजीकेंद्रीय मंत्री स्वर्गीय रामविलास पासवान यांच्या जयंतीचे औचित्य साधत धुळे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या प्रवेशद्वाराजवळ त्यांच्या प्रतिमेचे पूजन करून सामुदायिक अभिवादन करण्यात आले.

यावेळी लोक जनशक्ती पार्टीच्या पदाधिकाऱ्यांनी स्वर्गवासी रामविलास पासवान यांच्या आठवणी व जनहिताच्या कार्याला उजाळा दिला आहे. यावेळेस लोक जनशक्ती पार्टीचे उत्तर महाराष्ट्राचे अध्यक्ष दिलीप साळवे यांच्या हस्ते पूजन करण्यात आले. या कार्यक्रमाप्रसंगी धुळे लोकजनशक्ती पार्टीचे महिला अध्यक्षा शोभाताई चव्हाण, महासचिव कुंदन खरात, सामाजिक कार्यकर्ते श्रावण खैरनार, राज साळवे, मधुकर चव्हाण, प्रमोद सोनवणे, रवींद्र नगराळे, मुरली वाघ, सम्राट देवरे, गौतम वाघ, सागर चव्हाण, रमेश बागुल, सचिन चव्हाण आदी उपस्थित होते.

आरोग्याकडे दुर्लक्ष करु नका
आरोग्यम् धनसंपदा
शहरातील एक विश्वसनीय सुपर मार्केट
महावीर
घर संसार
• घाऊक आणि किरकोळ
• किराणा, सुका मेवा, मसाले
• क्रॉकरी, घरगुती उपकरणे
• घर साफ करणारे साहित्य, स्टील आणि अॅल्युमिनियम
• प्लास्टिकच्या वस्तू आणि बरेच काही
सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअप ऑर्डर आणि कोणतीही ऑर्डर 9850017181
वितरण स्थिती 9021395308 9657398232
घाऊक चौकशी 7620111118 9527111185
www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com
S.p. रोड, चेलीपुरा, शहागंज, औरंगाबाद
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर MIDC चिकलठाणा, औरंगाबाद

# नगराध्यक्ष, सरपंच थेट जनतेतून निवडून यावा

## महाविकास आघाडीचा निर्णय बदलण्याची आ. चंद्रशेखर बावनकुळे यांची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** देवेन्द्र फडणवीस मुख्यमंत्री असताना राज्यात नगरपालिका, नगरपंचायत व ग्रामपंचायतमधील नगराध्यक्ष, सरपंच थेट जनतेतून निवडून यावा, याबाबत निर्णय घेतला होता. पण महाविकास आघाडी सरकारने हा निर्णय बदलुन नगरपालिका, ग्रामपंचायतीमध्ये अस्थिर वातावरण तयार केले. येत्या विधिमंडळ अधिवेशनात महाविकास आघाडीचा निर्णय तातडीने बदलून सरपंच व नगराध्यक्ष थेट जनतेतून निवडण्याचा निर्णय घ्यावा, अशी मागणी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली असल्याचे माजी ऊर्जामंत्री आमदार चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज पत्रकारपरिषदेत सांगितले.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेन्द्र फडणवीस पुन्हा नगराध्यक्ष व सरपंच थेट जनतेतून निवडून आणण्यासंबंधी कायदा करून दिलासा देतील, असा विश्वास आमदार बावनकुळे यांनी व्यक्त केला. हा निर्णय सर्वच नगराध्यक्ष, सरपंचांना मान्य होईल, हा निर्णय नगरपालिका, ग्रामपंचायतमध्ये स्थिरता आणण्यासाठी महत्वाचा आहे, असेही ते म्हणाले.

**शिंदे-फडणवीस सरकार ओबीसींना न्याय देईल**



महाविकास आघाडीमध्ये झारीचे शुक्राचार्य होते. त्यांनी ओबीसी आरक्षण होऊ दिले नाही, असा आरोप आमदार बावनकुळे यांनी केला. सुप्रीम कोर्टाने चारदा आदेश देऊनही आयोग नेमला नाही. आयोग नेमला तर पैसे दिले नाही. मुख्यमंत्र्यांनी बैठक घेतल्या नाही. मध्यप्रदेश सरकारने कमिटीमध्ये तीन आमदारांचा समावेश करून ओबीसी आरक्षणासाठी स्ट्रक्चर उभे केले, पण महाविकास आघाडी सरकारने लोकप्रतिनिधींना वगळून आयोग तयार केला. आता माजी मंत्री विजय वडेट्टीवार व छगन भुजबळ हेच चुक झाल्याची कबुली देत आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेन्द्र फडणवीस यांनी पहिल्याच मंत्रिमंडळाच्या बैठकीत ओबीसी आरक्षणावर चर्चा केली. या दोघांना अभ्यास आहे. ओबीसीचा अचूक डाटा तयार करून सुप्रीम कोर्टापुढे सादर करण्याबाबत उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी कालच स्पष्ट केले. ओबीसींना शिंदे फडणवीस सरकारच न्याय देऊ शकते.

**विजेचा बट्ट्याबोळ केला**

राज्यात महाविकास आघाडी सरकारने विजेचा बट्ट्याबोळ केला. अघोषित भारनियमन सुरू केले, शेतकऱ्यांना वीज नाही, मागणी अन पुरवठ्यात मोठी तफावत आहे. कुणाचेही लक्ष नव्हते. त्यामुळे विजेच्याबाबतीत एक नंबरचे राज्य दहाव्या क्रमांकावर गेले. राज्यातील शेतकऱ्यांना वीज जोडणी, त्यांची वीज जोडणी कापणे, देखभालीकडे दुर्लक्ष करण्याचे काम मागील सरकारने केले. शिंदे फडणवीस सरकार मात्र याकडे लक्ष देईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**पीक कर्जाचा उडाला बोजवारा**

पीक कर्जबाबत पालकमंत्र्यांनी बैठक घेतली नाही. बँका शेतकऱ्यांना त्रास देत आहे. बँकेने ठरवलेले लक्ष्य गाठण्यासाठी स्टॉल लावले नाही, या प्रक्रियेसाठी कुणीही वाली नव्हता, त्यामुळे पीक कर्जाबाबत बोजवारा उडाला, असा आरोप आमदार बावनकुळे यांनी केला.



# राष्ट्रीय बॉक्सिंग अजिंक्यपद चॅम्पियनशिपसाठी महाराष्ट्र बॉक्सिंग संघ सज्ज

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** ५ जुलै ते १२ जुलै २०२२ दरम्यान बॉक्सिंग फेडरेशन ऑफ इंडिया यांच्यावतीने तामिनाडू (चेन्नई) येथे महिला व पुरूष युवा गटाच्या राष्ट्रीय बॉक्सिंग अजिंक्यपद चॅम्पियनशिप-२०२२ आयोजित करण्यात आली आहेत. या राष्ट्रीय बॉक्सिंग स्पर्धेसाठी नुकत्याच सिंधुदुर्ग येथे २२ जुन ते २८ जुन २०२२ दरम्यान झालेल्या ८० व्या पुरुष व १८ व्या महिला युवा गटाच्या राज्यस्तरीय बॉक्सिंग अजिंक्यपद स्पर्धेतील विजेत्या बॉक्सिंग खेळाडूंची निवड महाराष्ट्र बॉक्सिंग संघात करण्यात आली.

दिनांक ४ जुलै २०२२ रोजी मुला-मुलींचा महाराष्ट्र बॉक्सिंग संघ तामिळाडू (चेन्नई) येथे होणाऱ्या राष्ट्रीय बॉक्सिंग अजिंक्यपद स्पर्धेकरिता पुणे रेल्वे स्टेशन येथून रवाना झाला. या बॉक्सिंग संघाचा सत्कार व शुभेच्छा देण्यासाठी पुणे जिल्हा बॉक्सिंग संघटनेचे अध्यक्ष ॲड.गौतम चाबुकस्वार, ऑलिम्पियन व अर्जुन पुरस्कार विजेते मनोज पिंगळे, महाराष्ट्र बॉक्सिंग संघटनेचे उपाध्यक्ष भरतकुमार व्हावळ, महाराष्ट्र बॉक्सिंग संघटनेचे कार्यकारी सचिव मदन वाणी, महाराष्ट्र बॉक्सिंग संघटनेचे पंच अभिमन्यु सूर्यवंशी, नजीर सय्यद इ. मान्यवर उपस्थित होते. या महाराष्ट्र बॉक्सिंग संघाचे प्रशिक्षक म्हणून गणेश जाधव, धनंजय बनसोडे, वर्षा त्रिपाठी, कृष्णा सोनी, स्नेहा मात्रे, सुर्यकांत दुधभाते यांची निवड करण्यात आली. या राष्ट्रीय बॉक्सिंग अजिंक्यपद स्पर्धेत महाराष्ट्राला जास्तीत-जास्त पदक प्राप्त करून देण्याचे लक्ष केंद्रित करून महाराष्ट्राचा अभिमान वाढवा असे मत ॲड. गौतम चाबुकस्वार यांनी व्यक्त केली.

युवा मुलींचा बॉक्सिंग संघ : ४८ किलोः जान्हवी चुरी (मुंबई उपनगर), ५० किलोः सिमरन वर्मा (मुंबई उपनगर), ५२ किलोः देविका घोरपडे (पुणे शहर), ५४ किलोः सपना चव्हाण (सातारा जिल्हा), ५७ किलोः आर्या बारटक्के (सातारा जिल्हा), ६० किलोः वैष्णवी वाघमारे (पुणे जिल्हा), ६३ किलोः दिशा पाटील (जळगाव शहर), ६६ किलोः आदिती शर्मा (मुंबई उपनगर), ७० किलोः सना गोंसल्विस (पालघर जिल्हा), ७५ किलोः शर्वरी कल्याणकर (औरंगाबाद शहर), ८० किलोः नसविरा मुजावर (पुणे जिल्हा), ८० किलोवरीलः कांचन सुरांसे (अकोला शहर).

युवा मुलांचा बॉक्सिंग संघ : ४८ किलोः उमर शेख (पुणे जिल्हा), ५१ किलोः उस्मान अन्सारी (मुंबई जिल्हा), ५४ किलोः नीरज राजभर (मुंबई उपनगर), ५७ किलोः पृथ्वीराज बागल (पुणे शहर), ६० किलोः हर्ष पहिलवान (पुणे जिल्हा), ६३.५ किलोः चैतन्य पेडणेकर (पुणे शहर), ६७ किलोः मो. अयान शेख (मुंबई उपनगर), ७१ किलोः कुणाल घोरपडे (पुणे जिल्हा), ७५ किलोः अभिषेक जांगिड (नागपुर जिल्हा), ८१ किलोः आयुष मोकाशी (सातारा जिल्हा), ८६ किलोः कुणाल मोरे (पुणे जिल्हा), ९२ किलोः अभीवर्धन शर्मा (पुणे जिल्हा), ९२ किलोवरीलः अब्बास साबुनी (पुणे जिल्हा).

# आदिवासी मुलींची विक्री व गैर-आदिवासीसोबत होणारे विवाह थांबवा

## आदिवासी टायगर सेनेची निवेदनाद्वारे मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**एरंडोल :** तालुक्यातील चार-पाच वर्षापासून आदिवासी समाजाच्या मुलींचे गैर आदिवासी मुलांसोबत पैसे, आमिष दाखवून अल्पवयीन मुलींना विकत घेऊन त्यांच्यासोबत विवाह करणे, असा गोरख धंदा करण्याचा थाट सर्रासपणे सुरू आहे. आदिवासी समाजाच्या संस्कृतीप्रमाणे अशा गैर आदिवासी यांच्यासोबत विवाह करणे समाजाला कलंकित करत आहे त्यामुळे असे गैर आदिवासीसोबत होणारे विवाह थांबवा आणि शासनाने यावर नवीन कायदा करुन असे करणाऱ्या विरुद्ध कारवाई करण्याची मागणी आदिवासी टायगर सेनेनी केली आहे.

या घटनेला शासनाच्या वतीने महिला, बालिका, संरक्षण करणे यावर्षी महाराष्ट्र शासनाने नवीन कायदा करून याची अंमलबजावणी केली गेली पाहिजे. तसेच काही अल्पवयीन मुलींची तस्करी केले जात आहे म्हणून जबाबदार अधिकारी व शासनाने याबाबत कायदे, नियम तयार करून आदिवासी मुलींची गैर आदिवासी मुलांसोबत होणारे विवाह थांबतील व त्यांच्यावर कायद्यानुसार कारवाई करणे, अशी मागणी जळगाव जिल्ह्यातील एरंडोल तालुक्यातील आदिवासी टायगर सेना यांच्या वतीने तालुका पोलीस स्टेशन, तालुका तहसीलदार कार्यालय यांना निवेदन देण्यात आले.

याप्रसंगी पंढरीनाथ मोरे, भूषण भिल, संतोष सोनवणे, संभाजी पवार, एकनाथ भिल, उत्तम गायकवाड, गुलाब सोनवणे, सुरेश मोरे व सर्व आदिवासी टायगर सेनेचे कार्यकर्ते उपस्थित होते.



# हिंदुजा हॉस्पिटल माहीम येथे मोफत नर्सिंग बेसिक कोर्स उपलब्ध

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** ज्या मुली 10/12 पास आहेत व ज्यांचे वय 18 वर्ष पूर्ण आहे. ज्यांना नर्सिंग बेसिक कोर्स करायचा आहे. त्यांच्यासाठी हिंदुजा हॉस्पिटल माहीम येथे मोफत गव्हर्नमेंट स्कीममध्ये कोर्स उपलब्ध आहे. यासाठी 21 दिवस क्लास असेल व 90 दिवस प्रॅक्टिकल असेल. या करता हॉस्पिटलचे ओळखपत्र दिले जाईल व जे लोक बाहेरील जिल्ह्यातील असतील (मुंबई सोडून) त्यांना 11250 स्कॉलरशिप दिली जाईल. हा कोर्स पूर्णपणे मोफत असून याचे नाव "कोविड योद्धा" असे आहे. कोर्स पूर्ण झाल्यानंतर सर्व सर्वांना 100% जॉब प्लेसमेंट असेल. यामध्ये 13000 ते 15000/- पर्यंत सुरुवातीला पगार दिला जाईल.

यासाठी लागणारे कागदपत्रे आधार कार्ड, पॅन कार्ड, 3 पासपोर्ट साईज फोटो, १०/१२ मार्कशीट व पासआऊट, शाळा सोडल्याचा दाखला असेल तर किंवा झेरॉक्स ही चालेल, सर्व कागदपत्रे घेऊन हिंदुजा हॉस्पिटल माहीम येथे भेट देणे व रेफेरन्ससाठी मुरली धस 9011696064 यांना संपर्क करणे. कोणतीही १० वी पास कन्या/महिला डिप्लोमा इन मेडिकल लॅबोरेटरीमध्ये करिअर करु इच्छित असल्यास संपर्क करावा. एसएनडीटी महिला विद्यापीठाचे पीव्हीपी मध्ये शासकीय अनुदानित कोर्स उपलब्ध आहे. शिष्यवृत्ती आणि अन्य सर्व शासकीय लाभ मिळतील. इंटरशिप आणि कॅम्पस प्लेसमेंट सरकारी आणि खासगी हॉस्पीटल आणि लॅबॉरटरीमध्ये नोकरीच्या खूप संधी आहे. HTTPS://POLY22.DTE.MAHARASHTRA.GOV.IN/DIPLOMA22/ वरिल लिंकवर रजिस्ट्रेशन करा. HTTPS://CHAT.WHATSAPP.COM/LB4HBTI7GDALMEYX79XVXJ INTERESTED असल्यास अधिक माहितीसाठी मार्गदर्शन आणि समुपदेशन करिता वरिल WHATSAPP ग्रुप जॉईन करा. मॅसेज शेअर करायचे विसरु नका. आपल्या छोट्याशा मदतीने एखादीचे भविष्य बलशाली आणि भक्कम होईल. योग्य दिशा मिळेल.

याबाबत अधिक माहितीसाठी आपण प्रा.डॉ. धर्माजी खरात, विभाग प्रमुख, डिप्लोमा इन मेडिकल लॅबोरेटरी टेक्नॉलॉजी, प्रेमलिला विठ्ठलदास तंत्रनिकेतन, SNDT महिला विद्यापीठ, जुहू रोड, सांताक्रूझ (प), मुंबई यांच्याशी संपर्क करु शकता किंवा DMLT@PVP.SNDT.AC.IN वरिल ई-मेल आयडी वर ई-मेल पाठवून पण आपण चौकशी करू शकता.



# वाढदिवसाचा खर्च टाळून केले वृक्षारोपण

## राजुरमधील 'थोटे परिवाराचा' समाजभिमुख उपक्रम

आधुनिक केसरी न्यूज



**राजूर :** सध्या समाजात दिखाऊपणासाठी व प्रतिष्ठेसाठी वाढदिवस मोठ्या धुमधडाक्यात साजरे केले जातात. त्यासाठी चैनीच्या वस्तूवर वाढदिवसाच्या नावाने हजारो रुपयांची उधळपट्टी होत असल्याचे चित्र समाजात पहावयास मिळते. परंतु याला अपवाद म्हणून राजूर येथील भाजपाचे जेष्ट नेते तथा माजी सभापती शिवजीराव थोटे यांनी आपल्या नातवाचा वाढदिवस कुठल्याही प्रकारचा बडेजाव न करता साध्या पध्दतीने साजरा करून व वाढदिवसाच्या खर्चातून राजूरपासून जवळ असलेल्या थिगळखेडा येथील वनविभागाच्या ओसाड गायरान जमिनीवर विविध झाडांच्या कलमांचे वृक्षारोपण करून व सामाजिक बांधिलकी जोपासून पर्यावरण संरक्षणाचा संकल्प केला आहे.
सविस्तर माहिती अशी की राजुर येथील भाजपचे ज्येष्ठ कार्यकर्ते तथा माजी सभापती शिवाजीराव थोटे यांचा नातू अद्वैतच्या वाढदिवसानिमित्त केक किंवा डेकोरेशनवर कुठलाही व्यर्थ खर्च न करता त्या पैशातून वड,पिंपळ, कडुलिंब, जांभूळ, करंज यासारख्या देशी वृक्षांच्या शंभर कलमा विकत घेऊन ग्रामस्थ,सामाजिक कार्यकर्ते, वृक्षमित्र यांच्या सहकार्याने थिगळखेडा येथील वनीकरण व गायरान जमिनीत वृक्ष लागवड करून एक नवा पायंडा पाडला आहे.पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी अशा समाजभिमुख उपक्रमांची अत्यंत आवश्यक असून इतरांनीही वाढदिवसाचा अनाठायी खर्च टाळून वृक्षारोपण करण्याचे आवाहन माजी सभापती शिवाजीराव थोटे यांनी केले. यावेळी वृक्षमित्रांनी वृक्षारोपण करून पर्यावरण संरक्षणाचा संकल्प केला आहे.
यावेळी भाजपचे ज्येष्ठ कार्यकर्ते शिवाजीराव थोटे, मुक्ताबाई थोटे, सरपंच सुदाम ढवळे, उपसरपंच दिपक परचुरे, अशोक ढवळे, माजी सरपंच आण्णासाहेब भालेराव, ग्रामपंचायत सदस्य, तंटामुक्ती अध्यक्ष कृष्णा भालेराव, डॉ. सुदर्शन थोटे, डॉ. स्वाती थोटे, शरद थोटे, अश्विनी थोटे, विनोद दाभाडे, आदीजनांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी गावातील निसर्गप्रेमी नागरिकांची मोठया संख्येने उपस्थिती होती.

# छेडछाड केल्याप्रकरणी तरुणास अटक

आधुनिक केसरी न्यूज

**लासूर स्टेशन :** गंगापूर तालुक्यातील दायगाव येथील एक अल्पवयीन मुलगी शेतात जात



असताना तु मला आवडते म्हणत हात पकडुन छेडछाड केल्याप्रकरणी विशाल देवकाते (वय 21 वर्षे) याच्यावर गुन्हा दाखल करून शिल्लेगाव पोलिसांनी आरोपीला अटक केले.
शिल्लेगाव पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार एक अल्पवयीन मुलगी दि.3 रोजी रविवार रोजी शाळेला सुट्टी असल्याने शेती कामाला मदत करण्यासाठी सकाळी नऊ वाजेसुमारास शेतात जात असताना दायगाव येथील विशाल देवकाते याने अजुबाजूला कोणी नसल्याचा फायदा घेत त्या अल्पवयीन मुलीला तु मला आवडते असे म्हणत तीचा हात पकडून विनयभंग करत छेडछाड केली. त्या मुलीच्या फिर्यादीनुसार विशाल देवकाते विरोधात 354, पोस्को 812 नुसार गुन्हा दाखल करून आरोपी विशाल यास शिल्लेगाव पोलीसानी अटक केली आहे.

# ...तर मातोश्रीवर परत जाऊ

## पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत सर्वांचा मातोश्रीवर परत येण्याचा विचार सुरू होता, संजय राठोड यांचा खुलासा

आधुनिक केसरी न्यूज

**यवतमाळ :** मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या नेतृत्वात आम्ही ४० आमदारांनी घेतलेली भूमिका बंड नव्हे तर उठाव होता. मातोश्रीचे दरवाजे सन्मानाने आमच्यासाठी उघडले तर आम्ही सर्वजण परत जाऊ, असे खळबळजनक विधान शिंदे गटात सहभागी झाल्यानंतर प्रथमच यवतमाळला आलेल्या आमदार संजय राठोड यांनी केले.
पक्षातील बंडानंतर सर्वांचाच पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत 'मातोश्री'वर परत येण्याचा विचार सुरू असताना, काही व्यक्तींच्या अनावश्यक बडबडीमुळे ते शक्य झाले नाही, असा टोला त्यांनी खासदार संजय राऊत यांचे नाव न घेता लगावला.
शिवसेनेत बंड करून शिंदे गटात सहभागी झाल्यानंतर आमदार



संजय राठोड यांचे आज प्रथमच यवतमाळ येथे आगमन झाले. आम्ही आजही शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचेच शिवसैनिक आहोत. मात्र मविआत शिवसेनेवर कायम अन्याय झाला. शिंदे गटात गेलेल्या अनेक मंत्री, आमदारांनी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांना सत्तेतील व पक्षातील गळचेपीबद्दल वारंवार सांगूनही आमच्या समस्यांकडे कोणी लक्ष दिले नाही. त्यामुळे आत्मसन्मानार्थ आणि शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या ८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण या तत्वासाठी व लोकहिताची कामे करण्यासाठी आम्हाला बाहेर पडण्याशिवाय पर्याय नव्हता, असे राठोड म्हणाले.

# ग्रामीण वाहतूक शाखेच्या वतीने जड वाहतूक करणाऱ्या वाहनांवर कारवाई

आधुनिक केसरी न्यूज

**बिडकीन :** आज दि.६ रोजी बिडकिन पोलिस ठाणे हद्दीतील औरंगाबाद ते पैठण रोडवरील व्हिडीओकॉन कंपनीसमोर जड वाहतूक करणाऱ्या हायवेवर वाहतुक शाखेच्या वतीने कारवाई करत हायवा ट्रक ताब्यात घेण्यात आले आहे.
सविस्तर माहिती अशी की, औरंगाबाद ते पैठण रोडवरील व्हिडीओकॉन कंपनी समोरून वाहन क्रं. MH 03 CP 3596 हे वाहन चालक विनोद मधुकर जाधव वय ४४ वर्षे, रा. दत्तनगर, रांजणगाव, औरंगाबाद हे हायवे मधुन जड वाहतूक करत असताना वाहनावर कार्यवाही करण्यात आली आहे.
सदरील वाहनावर ११३/१९४ कलमानुसार हायवा ट्रक ताब्यात घेण्यात आला आहे. ही कार्यवाही वाहतूक शाखेचे सहायक फौजदार मधुकर गायकवाड व पोलिस जमादार बाळासाहेब लोणे यांच्या वतीने करण्यात आली आहे.






नागपूर : नवनियुक्त उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज रेशीमबाग येथील स्मृती मंदिराला भेट दिली. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे आद्य सरसंघचालक डॉ.केशव हेडगेवार आणि द्वितीय सरसंघचालक गोळवलकर (गुरुजी) यांच्या समाधीचे दर्शन घेऊन पुष्पांजली अर्पण केली. त्यांच्यासमवेत आमदार मोहन मते, आमदार प्रवीण दटके उपस्थित होते.

# डॉ.धर्मराज सुरोसे यांना अटल अवार्ड प्रदान

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** अटल भारत क्रीडा व कला संघ भारत यांच्याकडून दिला जाणारा अटल अवार्ड 2022 हा महात्मा फुले ग्रामविकास प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष तथा प्रधानमंत्री जनकल्याण योजना अभियानचे जिल्हाध्यक्ष डॉ.धर्मराज सुरोसे यांना जाहीर करण्यात येत असल्याची माहिती अटल भारत क्रीडा संघ मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीपचंद यादव यांनी ही माहिती दिली.
हा आवड मिळाल्याबद्दल खा.डॉ. सुजय विखे पाटील, आ.प्रा. राम शिंदे, आ.मोनिका राजळे, आ.राधाकृष्ण विखे पाटील,



आ.बबनराव पाचपुते, भाजपा जिल्हाध्यक्ष अरुण मुंडे, आ.बाळासाहेब मुरकुटे, आ.शिवाजीराव कर्डिले, अभय आगरकर, राहुल राजळे, संतोष रायकर, सचिन पोटरे, अशोक गाडे, डॉ.विलास राऊत, गणेश पालवे, आदिनाथ कृषी विकास प्रतिष्ठानचे जनरल सेक्रेटरी भास्करराव गोरे, प्राचार्य शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी विशेष अभिनंदन केले आहे.

# राष्ट्रीय खो-खो प्रशिक्षण शिबिर पुण्यात

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** भारतीय खो-खो महासंघाने काही दिवसांपूर्वी आशियायी व जागतिक खो-खो स्पर्धेची घोषणा केली होती. त्यानुसार चौथ्या आशियायी खो-खो स्पर्धेसाठी भारतीय संघाची निवड करण्यासाठी श्री छत्रपती शिवाजी क्रीडा संकुल बालेवाडी, पुणे येथे ६ ते १९ जुलै या कलावधीत प्रक्षिक्षण प्रक्षिण शिबीर आयोजित केले आहे. सपूर्ण देशातून १२० मुले या प्रक्षिण शिबिरासाठी निवडण्यात आली असून त्यांना प्रक्षिक्षण देण्यासाठी देशभरातून १२ प्रशिक्षकांची निवड करण्यात आली आहे.
महाराष्ट्रातून प्रतिक वाईकर, अक्षय बांगर, अनिकेत पोटे, ऋषिकेश मुर्चावडे, सुयश गरगटे, राहूल सावंत, सागर लेंगरे, गजानन शेंगाळ, अरुण अशोक गुणकी, दुर्वेश साळुंखे अशा मातब्बर खेळाडूंची निवड करण्यात आली आहे. या १२० खेळाडुंमधून भारताच्या संघाची निवड केली जाणार आहे. १२ पैकी ३ प्रशिक्षक महाराष्ट्रातून निवडल्याचे फेडरशेनचे सहसचिव डॉ. चंद्रजित जाधव यांनी कळविले आहे.
खो खो खेळाडूंचे कौशल्य आणि खेळातील बारकावे व परिणामकारकता वाढविण्यासाठी या राष्ट्रीय खो-खो प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिराचे प्रमुख म्हणून फेडरशेनचे सहसचिव डॉ. चंद्रजित जाधव आणि महाराष्ट्र समन्वयक म्हणून शिरीन गोडबोले यांच्याकडे जबबाबदारी सोपवण्यात आली आहे.

काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत
(रविवारी मोफत तपासणी)
नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!
(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)

डॉ. शेख ए.एच.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# मागास भागांच्या सर्वंकष विकासाचा अजेंडा राबविणार : देवेंद्र फडणवीस

आधुनिक केसरी न्यूज



**नागपूर :** विदर्भ व मराठवाडा या मागास भागांच्या विकासाशिवाय राज्याचा सर्वांगीण विकास शक्य नसल्यामुळे मागास भागांच्या सर्वंकष विकासाचा अजेंडा राबविणार असल्याची ग्वाही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज दिली. 'प्रेस क्लब ऑफ नागपूर'तर्फे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत माध्यम संवाद कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी ते बोलत होते. आमदार सर्वश्री चंद्रशेखर बावनकुळे, परिणय फुके, प्रवीण दटके, मोहन मते, टेकचंद सावरकर, विकास कुंभारे, कृष्णा खोपडे, माजी खासदार डॉ. विकास महात्मे, नागपूर प्रेस क्लबचे अध्यक्ष प्रदीप मैत्र, सचिव ब्रह्माशंकर त्रिपाठी, संजय तिवारी यावेळी उपस्थित होते.

महाराष्ट्राला देशात अग्रेसर राज्य बनविण्याचा संकल्प असल्याचे सांगताना उपमुख्यमंत्री म्हणाले की, विदर्भ, मराठवाडा व उत्तर महाराष्ट्र या मागास भागांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न करत असताना या भागातील पायाभूत सुविधांच्या विकासासोबतच सिंचन प्रकल्प, औद्योगिक क्षेत्रासाठी असलेली वीज दर सवलत तसेच वैधानिक विकास मंडळे पुनर्जीवित करण्यासाठी प्राधान्य देण्यात येणार आहे. त्यासोबतच शेती आणि शेतकरी यांचा अधिक शाश्वत विकास करण्यासाठी विविध योजनांची प्रभावी व परिणामकारक अंमलबजावणी करण्यात येईल. यामध्ये नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प, जलयुक्त शिवार अभियान, सौर कृषिपंप यासारख्या योजना पुन्हा सुरु करण्यात येणार असल्याचे उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

निसर्गाच्या कोपामुळे शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे, त्यापासून शेती व शेतकरी वाचविण्यासाठी विशेष यंत्रणा निर्माण करण्यात येणार आहे. त्यासोबतच मानवी चुकांमुळे पूर परिस्थितीचा सामना करावा लागू नये, यासाठी आपत्ती निवारण यंत्रणा अधिक सक्षम करण्यात येईल. आवश्यक तेथे वेगाने मदत पोहोचविण्याला प्राधान्य असल्याचे सांगताना उपमुख्यमंत्री म्हणाले की, अतिवृष्टीमुळे राज्याच्या काही भागात पूर परिस्थिती निर्माण झाली आहे. अशा परिस्थितीत जनतेला मदत करण्याच्या सूचना संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आल्या असून राज्यातील संपूर्ण परिस्थितीवर आपण लक्ष ठेवून असल्याचे उपमुख्यमंत्री फडणवीस यावेळी म्हाणाले. राज्याच्या काही भागात पावसाचे उशिरा आगमन झाल्यामुळे दुबार पेरणीची परिस्थिती निर्माण झाल्यास पुरेशा प्रमाणात बियाणे व खते उपलब्ध ठेवण्याचे निर्देश संबंधित विभागाला देण्यात आले असल्याचे उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

राज्याचा सर्वांगीण विकास करताना बारा बलुतेदार समुहातील शेवटच्या घटकांपर्यंत योजनांचा लाभ पोहोचविण्याला प्राधान्य असल्याचे सांगताना उपमुख्यमंत्री म्हणाले की, इतर मागास प्रवर्गाच्या आरक्षणासंदर्भात सर्वपक्षीय ओबीसी नेत्यांसोबत चर्चा करुनच परिपूर्ण अहवाल न्यायालयासमोर सादर करण्यात येईल. ओबीसी बांधवांना आरक्षण मिळावे, याला शासनाचे सर्वोच्च प्राधान्य असल्याचेही यावेळी त्यांनी जाहीर केले.

विदर्भ, मराठवाडा या मागास भागांच्या विकासाला पोषक असणाऱ्या समृद्धी महामार्गाच्या कामाला वेग देवून निश्चित कालावधी हे काम पूर्ण करण्यात येईल. तसेच मिहान प्रकल्पाला गती देण्याच्या दृष्टीने आवश्यक निर्णय घेयात येईल. विदर्भातील 89 सिंचन प्रकल्पांना यापूर्वी मान्यता देण्यात आली असून हे प्रकल्प वेगाने पूर्ण करण्यासाठी आवश्यक निधी तत्काळ उपलब्ध करुन देण्यात येईल, असेही यावेळी उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

प्रारंभी प्रेस क्लबचे अध्यक्ष प्रदीप मैत्र यांनी उपमुख्यमंत्री फडणवीस यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देवून स्वागत केले. संजय तिवारी यांनी आभार मानले.

# देवेंद्र रात्री वेष बदलून जायचे : अमृता फडणवीस

आधुनिक केसरी न्यूज



**नागपूर :** देवेंद्र रात्री वेश बदलून एकनाथ शिंदे यांना भेटायला जायचे. अशावेळी वेगळाच पोशाख करुन, डोळ्यावर मोठा गॉगल लावून ते घराबाहेर पडायचे. मलाही ओळखू यायचे नाहीत, असा गौप्यस्फोट उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी अमृता फडणवीस यांनी केला आहे.

सत्तासंघर्षाच्या काळात सगळे आमदार झोपल्यावर मी देवेंद्र फडणवीसांना भेटायला जायचो, असा गौप्यस्फोट मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधानसभेत केला आहे. त्यावर एका वाहिनीने अमृता फडणवीस यांच्याशी संवाद साधला असता त्यांनी नवी माहिती दिली. या सगळ्या पार्श्वभूमीवर अमृता फडणवीस यांच्याशी संवाद साधला. यावेळी त्यांनी बोलता बोलता, देवेंद्र रात्री वेष बदलून एकनाथ शिंदे यांना भेटायला जायचे, असा गौप्यस्फोट केला. अमृता फडणवीस यांनी सांगितले की, देवेंद्र हे खूप रात्रीपर्यंत काम करतात. त्या काळात ते जॅकेट वगैरे घालून घराबाहेर पडायचे. डोळ्यावर चष्मा घालायचे. मलाही ते कधीकधी ओळखायला येत नव्हते. काही नवीन सुरु आहे का? असे मी त्यांना विचारायचे. पण, उत्तर न देता ते प्रश्न टाळायचे. काही ना काही मोठी राजकीय घडामोड सुरु आहे, असे मला वाटायचं, असे अमृता यांनी सांगितले. मुख्यमंत्री शिंदे यांनीही काल विधानसभेत बोलताना आमच्यातील वाटाघाटीसाठी आणि चर्चांसाठी सगळे आमदार झोपल्यावर मी देवेंद्र फडणवीस यांना भेटायला जायचो, चर्चा करायचो आणि आमदार झोपेतून उठायच्या आतमध्ये मी हॅटेलवर यायचो, असा गौप्यस्फोट केला होता

# सोयगाव तालुक्यातील भक्तांना जळगावहून २०० रुपयांत पंढरपूर

आधुनिक केसरी न्यूज



**सोयगाव :** तालुक्यातील व सावळदबारा परिसरातील जामनेर, पहूर, जळगाव, भुसावळ, फत्तेपुर व सोयगाव भक्तांना आता रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांच्या पुढाकारातून आषाढीसाठी पंढरपूरला जाणाऱ्या भाविकांना विशेष रेल्वेची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. या रेल्वेच्या माध्यमातून भाविक भक्तांना आता २०० रुपयात भुसावळ व जळगावहून पंढरपूरला जाऊ शकतील. ९ जुलैला ही विशेष रेल्वे निघणार आहेत, अशी माहिती भाजपा जिल्हा उपाध्यक्ष जयप्रकाश चव्हाण यांनी दिली आहे.

लाखो भाविक पंढरपूर येथे विठ्ठलाच्या दर्शनासाठी जातात. या भाविकांच्या सोयीसाठी येत्या ६ व ९ जुलै रोजी पंढरपूरसाठी अमरावती स्थानकातून दुपारी दोन वाजता निघणार आहे. अमरावती, मलकापूर, नादुंरा, भुसावळ, जळगाव व पाचोरा,



चाळीसगाव, नांदगाव, मनमाड, अंकई, कोपरगाव, बेलापूर, अहमदनगर, दौंड, कुर्डुवाडी जंक्शन मार्ग पंढरपूरला जाणार आहे. भुसावळ येथून ही रेल्वे सायंकाळी सात वाजता निघणार असून सायंकाळी ७.१० वाजता निघेल तर जळगावहून ७:४० निघेल ही रेलवे सुटून सकाळी ९:३० वाजता पंढरपूरला पोहोचेल. तर वापसी फिरताना भक्तांना येण्यासाठी पंढरपूरहून दि.८/७/२२ ते ११/७/२२ रोजी दुपारी १२:१० रेल्वे पंढरपूरहून लागेल. भाविकांनी या विशेष रेल्वे प्रवेशाचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा उपाध्यक्ष भाजपा जयप्रकाश चव्हाण नांदातांडा यांनी केले.

# सोयगावात खरिपातील आठ पिकांना विमा कवच मिळणार

आधुनिक केसरी न्यूज



**सोयगाव :** तालुक्यात व फर्दापूर, सावळदबारा परिसरात यंदा खरीप हंगाम २०२२-२३ या नवीन खरीप हंगामासाठी पीकविमा योजना लागू करण्यात आली असून सोयगाव तालुक्यात तब्बल आठ खरिपाच्या पिकांचा या योजनेसाठी समावेश करण्यात आला असल्याची माहिती सोयगाव पंचायत समितीचे माजी सभापती धरमसिंग चव्हाण यांनी दिली आहे.

सावळदबारा परिसरात पीकविमा भरण्यासाठी ३१ जुलै पर्यंत अंतिम मुदत देण्यात आलेली असून शेतकऱ्यांनी तातडीने पीकविमा भरण्याचे आवाहन तहसीलदार रमेश जसवंत, तालुका कृषी अधिकारी संगीता पवार व कृषी सहाय्यक मानसिंग भोळे, अर्जुन सुरडकर यांनी केले आहे. खरीप हंगाम २०२२ - २३ साठी शासनाने खरीप हंगाम पीकविमा जाहीर केली आहे. यामध्ये सोयगाव तालुक्यात कापूस, सोयाबीन, मका, तूर, उडीद, मुग, ज्वारी आणि बाजरी या आठ खरीप पिकांचा समावेश करण्यात आला आहे. यासाठी पिकांच्या नुकसानीचा ७० टक्के जोखीम स्तर निश्चित करण्यात आला असून ३१ जुलैपर्यंत शेतकऱ्यांना पीकविमा आता भरता येणार आहे. तालुक्यात आठ पिकांना योजने अंतर्गत संरक्षण मिळणार असून नैसर्गिक आपत्ती, कीडरोग यामुळे पिकांचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना भरपाई देण्यात येणार आहे. कर्जदार व बिगर कर्जदार शेतकऱ्यांसाठी विमा योजना ऐच्छिक आहे. शेतकऱ्यांनी विमा प्रस्ताव सादर करण्याची अंतिम मुदत ३१ जुलै ठरविण्यात आलेली आहे. सोयगाव तालुक्यातील चार मंडळासाठी ही योजना लागू करण्यात आलेली आहे, अशी माहिती माजी सभापती धरमसिंग चव्हाण यांनी बोलताना दिली.




# अफगाणी सुफी संताची येवला येथे गोळी झाडून हत्या

आधुनिक केसरी न्यूज



**शिरवाडे वाकद :** अफगाणिस्तान येथील एक अहमद जरीफ चिश्ती वय ३८ या तरुण सुफी संतांची येवला तालुक्यातील चिंचोडी औद्योगिक वसाहत परिसरात काल सायंकाळी गोळ्या झाडून हत्या करण्यात आली. या प्रकारामुळे परिसरात खळबळ उडाली होती. अवघ्या काही तासात पोलिसांना या हत्येचा तपास लावण्यात यश आले असून ही हत्या त्यांच्या वाहनचालकानेच केल्याची माहिती पोलीस अधीक्षक सचिन पाटील यांनी पत्रकार परिषद घेऊन दिली. याबाबत सविस्तर वृत्त असे की, हे सुफी संत सिन्नर तालुक्यातील वावी पोलीस स्टेशन हद्दीत निर्वासित म्हणून राहत होते. येवला येथील चिंचोडी औद्योगिक वसाहत परिसरात मंगळवारी सायंकाळी ही घटना घडली. हल्लेखोरांनी त्याच्या डोक्यात गोळी झाडली, त्यानंतर त्याचा जागीच मृत्यू झाला. औद्योगिक वसाहत परिसरात अज्ञात व्यक्तीचा खून झाल्याची माहिती पोलिस पाटील वनिता सोमनाथ मढवई यांनी येवला शहर पोलिसांना दिली असता येवला शहर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक भगवान मथुरे, सहायक पोलीस निरीक्षक नितीन खंडागळे, उपनिरीक्षक मनोहर मोरे, आदींनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. रात्री उशिरा फॉरेन्सिक लॅबतज्ज्ञांना पाचारण करण्यात आले होते. अहमद जरीफ चिश्तीच्या कपाळावर गोळ्या झाडण्यात आल्या होत्या. चिश्तीच्या कपाळावर गोळी लागल्याचे गंभीर घाव आढळून आले आहेत. येवला पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला. त्यांनतर तातडीने जिल्हा पोलीस अधीक्षक सचिन पाटील यांनी घटनास्थळी भेट देवून पाहणी केली. मृताचे नाव अहमद जरीफ चिश्ती असे आहे, जो येवल्यात 'सूफी बाबा' म्हणून ओळखला जात होता. हल्ल्यांनातर हल्लेखोरांनी त्यांचे महिंद्रा एसयुव्ही वाहन तेथेच टाकून पळ काढला असून पोलिसांनी ते जप्त केले आहे. याबाबत येवला पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, मारेकऱ्यांना पकडण्यासाठी पोलीस सातत्याने छापेमारी करत आहेत. आज दुपारी पोलीस अधीक्षक सचिन पाटील यांनी पत्रकार परिषद घेऊन मयत हे सिन्नर तालुक्यातील वावी पोलीस ठाण्याच्या हद्दीत निर्वासित म्हणून राहत होते. त्यांना याठिकाणी राहण्याची परवानगी देण्यात आली होती. पैसा आणि मालमत्तेच्या वादातून हा प्रकार घडला आहे. केंद्र सरकारने त्यांना चार वर्षांपूर्वी निर्वासित असल्याचा परवाना दिला होता त्यामुळे ते येथे राहत असले तरी त्यांच्या नावे मालमत्ता खरेदी करू शकत नव्हते. त्यामुळे संशयितांच्या नावाने गाडी आणि मालमत्ता खरेदी करण्यात आले असल्याचे समजते आहे. काल (दि. ५) संशयित आरोपी हे वावी येथून येवल्याकडे आले होते. यादिवशी त्यांनी पूजा वगैरे केली. प्लॉट खरेदी करावयाचा आहे असे सांगून येवल्यातील चिचोंडी परिसरात आले होते. पूजा आटोपल्यानंतर ड्रायव्हरनेच त्यांच्यावर गोळ्या झाडून ठार केले अशी माहिती पोलीस अधीक्षक सचिन पाटील यांनी दिली.